शनिवार । २८ मार्च १९८१ । एक रुपया

# माणूस

## तर्कतीर्थ - ८०

" शास्त्रीजींनी स्वतःबद्दल म्हटले आहे की, ' मी सतत वाहत आलो; पाय टेकायला कुठे जागाच सापडली नाही, ' हे खरे होते. या विचारवंतापुढे विचारांची नवी नवी क्षितिजे येत होती व त्यांची सतत धावपळ चालू होती. "

—रा. ग. जाधव

## अॅटनबरांचा ' गांधी ' आज हवाच होता का ?

पृष्ठ...२२

दादुमियांच्या डायरीतील काही पाने ....पृष्ठ ८

पुणे वार्ता

# 'आजच्या सामाजिक दुर्दैवाचे आपणच कारागीर आहोत !'
## —तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी

रविवार, दिनांक २२ मार्च. महाराष्ट्र साहित्य परिषदेनं तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशींचा सत्कार व प्रकट मुलाखत आयोजिलेली. या वेळी परिषदेनं आपला नेहमीचा (वाहनांच्या आवाजाने काहीही ऐकू न येणारा) हुकमी हॉल न घेता टिळक स्मारक मंदिराचा हॉल घेतल्याने श्रोत्यांना जरा बरंच वाटलं. तर्कतीर्थांचा ८० वा वाढदिवस पुण्यातल्या इंडियन इन्स्टिटयूट ऑफ एज्युकेशनने नुकताच साजरा केला. त्या वेळच्या (पीळदार) भाषणामुळे तो कार्यक्रम फारसा रंगला नाही. त्याच पार्श्वभूमीवर ही प्रकट मुलाखतीची कल्पना विशेषत्वाने भावणारी ! मुलाखत घेणारे होते डॉ. भीमराव कुलकर्णी, डॉ. वि. रा. करंदीकर, श्री. नानासाहेब गोरे आणि श्री. ग. वा. बेहरे.

नाना विषयावरचं सखोल वाचन, चिंतन यामुळे तर्कतीर्थांच्या विचारामधली स्वच्छता आणि सुसूत्रता जाणवण्यासारखी असते. आस्तिकता आणि पाखंडीपणा दोन्ही एकत्र नादणारं हे व्यक्तिमत्त्व महाराष्ट्राच्या सांस्कृतिक व वैचारिक जीवनाचा ठेवा आहे.

समारंभाच्या सुरुवातीला परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. रा. करंदीकर यांनी तर्कतीर्थांचा सत्कार केला आणि प्रकट मुलाखतीला सुरुवात झाली. सुमारे दोन तास चाललेल्या या मुलाखतीत अनेक विषयांचा ऊहापोह झाला. तर्कतीर्थांच्या वैयक्तिक जीवनापासून भारताची सद्यःस्थिती येथपर्यंत अनेक विषयाचा समावेश त्यामध्ये होता.

आज-काल चर्चिला जाणारा आणि धगधगता प्रश्न म्हणजे गुजराथमधील राखीव जागांसंबंधीचे आंदोलन. शास्त्रीजींना राखीव जागा, सवलती यावर प्रश्न विचारला. शास्त्रीजी उत्तरले, 'हजारो वर्षांपासून गावकुसाबाहेर राहिलेली माणसं आपल्या बरोबरीची व्हावीत असं आपल्याला मनापासून वाटतच नाही. त्यातूनच राखीव जागांच्या प्रश्नावरून उसळलेल्या दंगलीसारखे प्रसंग उद्भवतात. दलितासाठी राखीव जागा राहिल्याने इतर सर्वसामान्य लोकावर अन्याय होत नाही. हा प्रश्न भडकवण्यासारखा नाही. या तात्पुरत्या सवलती आहेत.

'दलिताच्या मानाने आपण अनंत सवलती घेतो. कारण आपल्याला परिस्थिती अनुकूल आहे. आज पुण्यासारख्या शहरात सदाशिव, नारायण, डेक्कनसारख्या भागात महारांची वा मागाची खानावळ वा डॉक्टरकी चालेल का ? शहरात ही परिस्थिती आहे, खेड्यांतून तर या वस्त्या तशाच गावाबाहेर आहेत. अस्पृश्यता नष्ट झालीय वगैरे घटनेतल्या गोष्टी केवळ लिखापढीच्या आहेत. दलित व सवर्ण यामधला विकल्प या सवलतींनी बिघडायचे कारण नाही.

'नामांतरासारख्या प्रश्नावरून घरं जळतात, पोरं, ढोरं मृत्युमुखी पडतात हे या देशात काय चाललंय ? याचा अर्थच असा की, माणसं 'माणूस' म्हणून जवळ यावीत असं कुणाला वाटतच नाही. माणसावर झालेल्या अन्यायाची माणसालाच खंत नाही, जाणीव नाही. त्यांच्यावर झालेल्या या अन्यायाचं परिमार्जन आपण केलं पाहिजे. अन्यथा हे पातक इतकं भोवेल की या देशाला भवितव्य आहे की नाही हाच प्रश्न निर्माण होईल ! या दुर्दैवाचे कारागीर आम्हीच आहोत. माणसाची कदर करण्यासाठी ही अस्पृश्यता आपणच नष्ट केली पाहिजे !'

आज निवडून आलेला आणि निवडून देणारे यामधील सांधेच खिळखिळे झालेत, असंही तर्कतीर्थांनी या संदर्भात सांगितलं.

सवलतीच्या प्रश्नाबाबत अशी स्वच्छ भूमिका घेणारे शास्त्रीजी ईश्वराच्या अस्तित्वाबाबत बोलताना म्हणाले,

'देव आहे किंवा नाही याचा उलगडा मला झालेला नाही. माझी श्रद्धा नितांत गाढ आहे. मी ते साहित्य वाचू लागलो की, भक्तीने डोलतो; पण त्याबाबत विचार करू लागतो तेव्हा अस्वस्थ होतो. देव नाही असं सांगणारा मला मोठा लेखही मी लिहिलाय. देव प्रेममय, सर्वज्ञ आणि न्याय्य आहे या समजुतीतच तार्किक अंतर्विरोध आहे. देव


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : विसावे

अंक : त्रेचाळिसावा

२८ मार्च १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये



प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मताशी चालक सहमत असतीलच असे नाही.



राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

जर असा असेल तर मग आधळी पोरं का जन्मतात? अडाणी, निर्बुद्ध अशी माणसं का निर्माण होतात? क्रूर, राक्षसी वृत्तीची माणसं का जन्मतात? हे सारं मागच्या कर्मांचं फळ आहे, असं सांगून कसं बरं चालेल? अहो, मागच्या कोणत्या कर्माचं हे फळ आहे हे तरी त्या माणसाला समजायला नको का? अज्ञात कारणाबद्दल शिक्षा, यासारखा दुसरा अन्याय नाही. हे अन्यायी जग का निर्माण होतं? युगानुयुगे इथं अत्याचार कसे होतात? देव म्हणे चातुर्मासात झोपी जातो. मला वाटतं तो बाराही महिने झोपलेलाच असतो. अस्पृश्यतेचं, गुलामगिरीचं समर्थन देवच करतो याला अर्थ नाही. हे प्रश्न सुटायचे नाहीत अन् मी मात्र असाच संशयग्रस्त राहणार!'

संस्कारक्षम वयात तुम्ही जीवनाचं कोणतं स्वप्न रंगवलंत? असा प्रश्न शास्त्रीजींना विचारण्यात आला. त्याचं उत्तर देताना शास्त्रीजी म्हणाले, 'आपण क्रांतिकारक व्हावं आणि वेदान्त त्याला मदत करतो अशी चमत्कारिक जाणीव त्या वेळी मला झाली. त्या दिशेने मी गेलो नाही खरा; पण त्याचा माझ्या जीवनावर विलक्षण परिणाम झाला.'

प्रचलित तत्त्वज्ञान व प्रवृत्ती 'जगन्मिथ्या' अशी दिसते, याचा राष्ट्रीय, सामाजिक जीवनावर काय परिणाम झाला? या प्रश्नावर बोलताना ते म्हणाले, 'विलक्षण परिणाम झाला आहे. या जगाबद्दलची जी अनास्था निर्माण होते तिला या तत्त्वज्ञानाची बैठक असते. हा भ्रम आहे, हे खरं नाही. या जाणिवेमुळं हे जग बदलावं, अशा तऱ्हेचा कर्तृत्वावरचा अदम्य विश्वास राहात नाही. त्याचा इतिहासावर, समाजावर कुंठित करणारा परिणाम झाला आहे.'

शास्त्रीजींनी लोकशाही तत्त्वाची मीमांसा करताना लोकशाहीचा खरा अर्थ आणि आजचे त्याचे स्वरूप याची मांडणी फार सुरेख केली ते म्हणाले, 'आजचा राजसत्तेचा वरचष्मा ही लोकशाहीची विकृती आहे. कारण माणूस स्वत:च्या कर्तृत्वाने पुढे गेला पाहिजे, अशी परिस्थिती निर्माण करणं आणि त्यामध्ये येणाऱ्या अडचणी दूर करणं हे राजसत्तेचं काम आहे; पण आज नेमकं उलट घडत आहे. आज राजसत्ता नियंत्रणाची साधनं अधिकाधिक खोल दडपत चाललीय आणि माणसं या जाळ्यात वेढली जाताहेत लोकशाहीच्या बाल्यावस्थेतल्या या अडचणी आहेत, असं नेहरू म्हणत; पण स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अडचणी सुटण्याऐवजी त्याची गुतागुत जास्तच वाढत चालली आहे. त्याचा इथल्या राजकीय, सामाजिक जीवनावरही परिणाम झालेला दिसतो. देशातला हा माणूस खेड्यातला आहे. त्यानं स्वत:ची नियंत्रणं शोधली पाहिजेत, स्वत:ची आर्थिक यंत्रणा उभी केली पाहिजे; पण ते होत नाहीये इथला माणूस अंतर्मुख होऊन स्वत:च्या ताकदीवर उभा न राहता राजसत्तेच्या कुबड्यांच्या आधारावर उभा राहिला तर मोठी कठीण परिस्थिती निर्माण होईल. या देशाचं भवितव्य मला निराशाजनक वाटत नसलं तरी चिंता उत्पन्न करणारं मात्र निश्चित वाटतं.

'आज लोकशाही राज्य आपण म्हणवतो; पण इथंही बाई नाहीत म्हणजे काही नाही आणि कोणी नाही, असं चित्र दिसतय. हे लोकशाही जीवनपद्धतीचं लक्षण नाही. इथल्या लोकांमध्ये सामुदायिक जीवन जगण्याची शक्ती जोपर्यंत निर्माण होत नाही तोपर्यंत ते 'राजकीय प्राणी' बनणार नाहीत.'

शिक्षणाने समाज बदलेल अशी कल्पना असताना प्रत्यक्षामध्ये सुशिक्षितात उदासीनता किंवा अंध कर्मवाद वाढतो आहे हे कसे? असा प्रश्न श्री. नानासाहेब गोरे यांनी विचारला, शास्त्रीजींनी शिक्षणपद्धतीतले फरक न्याहाळलेले आहेत, ते प्राज्ञपाठशाळेतले विद्यार्थी, आताची शिक्षणपद्धती सदोष आहे असं म्हणत असताना त्यांचं चिंतन फार मोलाचं वाटतं. शास्त्रीजी म्हणाले—

'सध्याच्या शिक्षणात मोठी उणीव म्हणजे चिकित्सक वृत्तीचा अभाव. आज ज्ञानाबद्दल प्रेम नाही, आस्था नाही. शिक्षणामध्येच संवाद नाही, उलट तिथं गर्दी वाढतेय. त्यामुळं माणसामाणसातला संवादच नाहीसा होऊ लागलाय. आज बुवाबाजी वाढतेय, सुशिक्षित लोक देवदेव करताहेत, त्याची प्रेरणा केवळ स्वार्थी असते. हा अपधर्म आहे, त्याचं उत्तर मात्र माझ्याजवळ नाही.'

स्त्रियाबद्दल बोलताना शास्त्रीजींनी अतिशय मूलभूत विचार मांडला. ते म्हणाले, 'आईच्या मांडीवरच मनुष्य शिकतो, नैतिक जीवनाचा पाया आईकडूनच येतो, ही स्त्री जर शिकली तरच मानवी संस्कृतीमध्ये क्रांती होईल.' ¤

तर्कतीर्थांच्या या सबंध बोलण्यात विचारातला ठामपणा आणि स्वच्छता होती. ऐंशी वर्षांचा अनुभवपुरुषच त्यांच्या तोंडून हे सारं वदवत होता; पण त्याच वेळी या बोलण्यात आर्जवही होतं, कळकळही होती. एका प्रकांड पंडिताचं त्या संध्याकाळचं ते दर्शन मोठं लोभसवाणं होतं.

आजच्या विचार करणाऱ्या तरुण पिढीला जे प्रश्न मुख्यत्वे भेडसावत असतील त्याच प्रश्नांना मुलाखतकारांनी हात घातला, याबद्दल त्यांचं अभिनंदन केलं पाहिजे. राखीव जागाविरोधी आंदोलनाबाबत तर्कतीर्थांची काय भूमिका आहे, याबद्दल सर्वांनाच कुतूहल होतं, काही अपेक्षाही होती. तर्कतीर्थांनी आपल्या सविस्तर, स्वच्छ निवेदनात त्याचं पूर्ण समाधान केलं. आंदोलनाला प्रखर वैचारिक विरोध करताना त्यांनी जे मुद्दे मांडले ते त्याच पातळीवरून खोडून काढणं जवळजवळ अशक्य आहे. काही क्षुल्लक, क्षुद्र स्वार्थ आणि खोटा नैराश्यवाद यातून उभ्या राहिलेल्या गुजराथमधल्या या आंदोलनाला तर्कतीर्थांसारख्या पाच-दहा माणसांनी अशा तऱ्हेने खंबीरपणे उठून उत्तरं दिली तर हे विष देशाच्या इतर अंगामध्ये पसरू शकणार नाही, असं मनोमन वाटलं.

या वादाचं उत्तर देताना आपल्या तर्कशुद्ध युक्तिवादाला नैतिक बंधनाचं जे अभेद्य कवच तर्कतीर्थांनी उभं केलं ते लक्षणीय आहे. त्यांचं हे निवेदन ऐकत असताना त्यांनीच स्वत:च्या विचारप्रणालीविषयी केलेलं स्पष्टीकरण सारखं आठवत होतं. एका लेखी मुलाखतीत तर्कतीर्थ म्हणाले होते— 'माझ्या विचारप्रणालीची साधारणपणे आंतरराष्ट्रीय ऐहिक मानवतावाद व उदारमतवाद ही दोन सूत्रे मुख्यत: सांगता येतील. परलोकवादी वा वेदान्ती वा धार्मिक दृष्टिकोण माझ्या विचाराची बैठक नव्हे. अमुक एका विचारप्रणालीच्या विचारवंताचा माझ्यावर विशेष प्रभाव पडला, असे म्हणता

मलपृष्ठ १ वर

# शुक्ल राजिनामा

## अस्थैर्य कितपत टळेल ?

वा. दा. रानडे

केंद्रीय मंत्रिमंडळाची पुनर्घटना करण्यापूर्वी नको असलेले मंत्री पंतप्रधान इंदिरा गांधी काढून टाकीत आहेत काही महिन्यापूर्वी कमलापती त्रिपाठींनी राजिनामा दिला आणि आता पुरवठामंत्री विद्याचरण शुक्ल यांना मंत्रिमंडळाबाहेर पडावे लागले आहे हे बदल काही नव्या धोरणाचे, नव्या दिशेचे निदर्शक आहेत काय ? या दृष्टीने त्यांचा विचार करायला हवा.

शुक्लांना काढण्यामागे इंदिरा गांधीच्या मनात कोणता विचार प्रभावी होता ? संसदेत त्यांच्या राजिनाम्यासंबंधी कोणतेही निवेदन करण्यात आले नाही, असे निवेदन केलेच पाहिजे असे सरकारवर बंधन नाही व मंत्र्यांना तसे मी सागू शकत नाही, असे सभापती बलराम यांनी सांगितले; पण कारणे अधिकृतपणे सांगितली गेली नसली तरी त्यासंबंधी बातम्या आलेल्या आहेत केवळ अकार्यक्षमतेबद्दल शुक्लांना काढून टाकले असे म्हणता येणार नाही. ते फार तर एक कारण म्हणता येईल. आपले मंत्रिमंडळ बनविताना पंतप्रधान श्रीमती गांधींनी कार्यक्षमता हा काही मुख्य निकष मानला नव्हता, त्यांच्या दृष्टीने मुख्य निकष होता तो इंदिरानिष्ठेचा. कार्यक्षमतेचाच मुख्य निकष लावावयाचा तर शुक्लांच्याबरोबर अनेक मंत्र्यांना रजा द्यावी लागेल, तसे त्यांनी केलेले नाही. एकट्या शुक्लांनाच आणि नेमके या वेळीच त्यांनी बाजूला काढले त्यामागे अकार्यक्षमतेपेक्षा दुसरी कारणे अधिक महत्त्वाची आहेत. शुक्ल काही नवे मंत्री नव्हेत. आणीबाणीच्या काळात ते माहितीमंत्री होते त्यावेळीही त्यांनी मोठी कार्यक्षमता दर्शविली नव्हती. इंदिराभोवतीच्या चौकडीतले एक मंत्री म्हणूनच त्यांची ख्याती होती. त्यांना वास्तविक पुन्हा मंत्रिमंडळात घ्यावयासच नको होते; पण संजय गांधीच्या आग्रहामुळे त्यांचा समावेश झाला असावा. संजयच्या निधनानंतर संजय गटाचा प्रभाव संपला; पण संजयच्या आग्रहाने किंवा प्रवाहाने ज्यांना मंत्री नेमले त्यांना एकदम काढून टाकण्याची कारवाई काही इंदिरा गांधींनी केली नाही. तशी त्यांना आवश्यकताही वाटली नाही. संजय गटाचा प्रभाव कमी झालेलाच आहे. त्यांच्या मंत्र्यांना इंदिरा गांधीच्या धतंत्राने वागावे लागत आहे. संजयचा इंदिरा गांधींपाशी जो प्रभाव होता तो संजय गटापैकी एकाचाही नाही. त्या गटाचे सगळेच मंत्री एवढ्यात काढून टाकून त्याला दुखविण्याची आवश्यकता इंदिरा गांधींना वाटत नाही. तेव्हा शुक्लांना काढून टाकण्यामागे संजय गटाचा प्रभाव कमी करणे हे महत्त्वाचे कारण होते, असे म्हणता येणार नाही.

शुक्लांना काढून टाकण्यामागे पक्षशिस्त हा तरी महत्त्वाचा मुद्दा होता का ? त्यांचा गट मध्य प्रदेशाचे मुख्यमंत्री अर्जुनसिंग यांचे मंत्रिमंडळ पाडण्याच्या कारवाया करीत होता. राज्यातील इंदिरा काँग्रेस मंत्रिमंडळाला ज्यामुळे अस्थैर्य येईल अशा हालचाली कोणीही करावयाच्या नाहीत, असा इशारा इंदिरा काँग्रेसच्या कार्यकारिणीने दिला असताही अर्जुनसिंग मंत्रिमंडळाविरुद्ध मोहीम आपण चालू ठेवणार, असे त्यांनी जाहीरपणे म्हटले होते वास्तविक त्याच वेळी त्यांच्याविरुद्ध शिस्तभंग कारवाई करायला हवी होती. तिला विलंब का लावला ? शुक्लांच्या राजिनाम्यासंबंधी संसदेत त्यांनी निवेदन केले नाही; पण पक्षशिस्तीसाठी हा राजिनामा असेल तर पक्षाच्या अध्यक्ष या नात्याने श्रीमती गांधींनी किंवा सरचिटणिसाने निवेदन करायला हवे होते. विद्याचरण शुक्लांचे बंधू माजी मुख्यमंत्री श्यामचरण शुक्ल यांनी गेल्या नोव्हेंबरमध्येच अर्जुनसिंग मंत्रिमंडळाविरुद्ध प्रचारमोहीम उघडली होती. इंदिरा काँग्रेसमध्ये तोपर्यंत त्यांना प्रवेश मिळाला नसला तरी त्यांच्या मोहिमेला विद्याचरण यांचा पाठिंबा असला पाहिजे. अर्जुनसिंग मंत्रिमंडळातील आरोग्यमंत्री श्रीनिवास तिवारी यांचा राजिनामा मुख्यमंत्री अर्जुनसिंग यांनी २ डिसेंबर १९८० ला मागितला तेव्हा छत्तीसगढ विभागातील शुक्ल गटाच्या आमदारांनी दिल्लीस जाऊन अर्जुनसिंग यांच्या विरुद्ध असलेले आपले आरोप मांडले. त्या गटाने हे आरोप केल्यामुळेच तिवारींचा राजीनामा मुख्यमंत्री अर्जुनसिंगांनी घेतला. असे शुक्ल गटाचे म्हणणे होते. सरकारी नोकरांच्या मोठ्या प्रमाणावर बदल्या वीजमंडळाच्या रद्दीमालाच्या विक्रीत आणि जमीनवाटपात गैरप्रकार हे अर्जुनसिंग यांच्या कारभाराविरुद्ध त्यांचे मुख्य आरोप होते. शुक्ल घराण्याचे मुख्यमंत्रिपद गेले ते पुन्हा


**प्रसिद्ध झाले.**

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे
प्रेरणादायी चरित्र
—विजय

**एक होता कार्व्हर**

लेखिका : सौ. वीणा गवाणकर
राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव, पुणे ३०
**मूल्य : रुपये पंधरा**

मिळवावे असा शुक्ल गटाचा प्रयत्न होता. अर्जुनसिंग मंत्रिमंडळाविरुद्ध डिसेंबरपासून शुक्ल गटाची ही प्रचारमोहीम चालू होती. त्यानंतर जवळजवळ तीन महिन्यांनी इंदिरा गांधींनी त्यांना मंत्रिमंडळातून काढले. त्यापूर्वीच ही कारवाई का केली नाही याचा स्पष्ट उलगडा होत नाही. एका राज्यातल्या मंत्रिमंडळाविरुद्ध केंद्रीय मंत्र्याने उघडपणे प्रचारमोहीम उघडावी हा गंभीर प्रकारचा शिस्तभंग होता. तेव्हा पंतप्रधानांनी त्याच्याविरुद्ध केलेली कारवाई योग्यच होती; पण ती याआधी का केली नाही, याचा उलगडा त्यांनी केलेला नाही.

पंतप्रधान आणि पक्षाध्यक्ष अशा दुहेरी भूमिकांतून श्रीमती गांधींनी हा निर्णय घेतला आहे काय? शुक्लांना अकार्यक्षमतेसाठी मंत्रिमंडळातून काढले असे सांगण्यात येते. म्हणजे मुख्यतः पंतप्रधान या नात्याने हा निर्णय घेतलेला आहे. पक्षशिस्तीच्या दृष्टीने ही कारवाई केलेली असेल तर शिस्तभंग समितीकडे हे प्रकरण सोपविणे, तिने शुक्लविरुद्ध असलेले आरोप त्यांना कळवून त्यांच्याकडून उत्तर मागविणे आणि त्याचा विचार करून कारवाई करणे हा योग्य मार्ग होता. तसे या बाबतीत घडले असल्याचे दिसत नाही. पक्षपातळीवर कारवाई करायची म्हणजे त्याचे सभासदत्व काही वर्षे स्थगित ठेवणे यासारखे कडक उपाय योजायला हवे होते. तसे काही केलेले नाही. विद्याचरण शुक्ल इंदिरा काँग्रेसचे सभासद, एवढेच नव्हे तर खासदारही आहेतच. त्यांचे फक्त मंत्रिपद गेले आहे.

केंद्रीय मंत्रिपद गेल्याने अर्जुनसिंग मंत्रिमंडळाविरुद्ध शुक्ल गटाच्या कारवाया थांबतील का? पक्षात आपल्यामागे मोठा गट आहे, हा त्यांचा आपल्या सामर्थ्याबद्दलचा अंदाज बरोबर असेल आणि विरोधी पक्षाच्या सहकार्याने आपण मंत्रिमंडळ पाडू शकू, अशी त्यांना खात्री वाटत असेल तर त्यांच्या कारवाया चालू राहण्याची शक्यता अजूनही नाकारता येत नाही. येत्या काही आठवड्यांतच हे स्पष्ट होईल. मंत्रिपद गेल्याने विद्याचरण शुक्लांना आता राजकीय भवितव्य राहिलेले नाही. तेव्हा मंत्रिमंडळ पाडून आपल्या गटाचे बळ दाखवावेच, असा विचार ते करण्याचा संभव आहे.

इंदिरा काँग्रेसची सत्ता असलेल्या राज्यात अस्थैर्य निर्माण होऊ द्यावयाचे नाही, बंडखोरी चालू द्यावयाची नाही, मुख्यमंत्र्यांच्या बाजूनेच ठामपणे उभे रहायचे या इंदिरा गांधींच्या धोरणाची कसोटी गोव्यात लागणार आहे. तेथे इंदिरा काँग्रेसच्याच बहुसंख्य आमदारांचा मुख्यमंत्री राणे यांना विरोध आहे. मुख्यमंत्र्यांनी गेल्या शनिवारी बोलावलेल्या इंदिरा काँग्रेस विधानसभा पक्षाच्या सभेला २७ पैकी फक्त १२ सभासद उपस्थित होते. बहुसंख्य आमदार बंडखोर गटाच्या बाजूला होते व त्या गटाने आपली वेगळी बैठक अन्य ठिकाणी घेतली होती. अशा परिस्थितीत राणे मंत्रिमंडळ टिकणे कठीण आहे. कदाचित् हा लेख प्रसिद्ध होईपर्यंत यासंबंधी काही महत्त्वाची बातमी आलेलीही असेल. मणिपूरमध्ये इंदिरा काँग्रेसच्या दहा सभासदांची बंडखोरी पक्ष थोपवू शकला नाही. तेथे मंत्रिमंडळाला राजीनामा द्यावा लागला व राष्ट्रपतींची राजवट आली. गोव्यातही असे काही घडणे अशक्य नाही. अस्थैर्य टाळण्यासाठी मुख्यमंत्र्यांच्या पाठीशी राहण्याचे धोरण नेहमीच बरोबर म्हणता येणार नाही. बहुसंख्य सभासदांचा पाठिंबा मुख्यमंत्र्यांनी गमावला असेल तर ते बदलायलाच हवेत. तेव्हा शुक्लांना काढण्याने बंडखोरी थांबेल असे दिसत नाही. ❑




अवती भवती । शरद कृष्णन

## □ उ. प्रदेशचे मुख्यमंत्री–विश्वनाथ प्रतापसिंग

उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदी आजवर अनेक डुढ्ढाचार्य विराजमान झाले आहेत. देशामधील सगळ्यात मोठ्या प्रांताच्या या मुख्यमंत्र्याला तसे विशेष महत्त्व असते. स्वाभाविकपणे केंद्रीय नेतेही मुरब्बी, राजकारणी व्यक्तींच्या हाती मुख्यमंत्रीपदाची सूत्रे देतात. गेल्या निवडणुकीनंतर इंदिरा कॉंग्रेसने उत्तर प्रदेश विधानसभेमध्ये झंझावती बहुमत मिळवले. या पक्षाच्या आमदारानी एकमताने कै. संजय गांधी यांची निवड केली. तथापि इंदिराजीच्या मनात काही वेगळा विचार होता. त्यानी विश्वनाथ प्रतापसिंग यांची निवड केली आणि निम्म्यापेक्षा जास्त आमदाराना ज्यांचे नावही माहीत नव्हते ते व्ही. पी. सिंग उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री झाले. उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदी नवीन व्यक्ती विराजमान झाली की, लगेच कटकारस्थानाना प्रारंभ होऊन नवीन मुख्यमंत्र्यांना सत्ताभ्रष्ट करण्याचे प्रयत्न सत्ताधारी गटामधीलच मंडळीकडून सुरू होतात. व्ही. पी. सिंग यानाही अशा अंतर्गत संघर्षाला तोंड द्यावे लागत आहे. उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री कमलापती त्रिपाठी याना आपल्या चिरंजिवाना राज्याच्या मुख्यमंत्रीपदी विराजमान करण्याची महत्त्वाकांक्षा आहे. त्यांचे चिरंजीव लोकपती त्रिपाठी, सिंग मंत्रिमंडळामध्ये आरोग्यमंत्री आहेत आणि आपले खाते संभाळून ते सिंग यांच्याविरुद्ध राजकारण खेळत आहेत. व्ही. पी. सिंग याना या गोष्टीची पूर्ण कल्पना असली तरी ते त्याची जाहीर वाच्यता कधी करत नाहीत. या संदर्भात प्रश्न विचारल्यावर ते हसून म्हणतात, 'अशी 'ब्राह्मण लॉबी' अस्तित्वात असून लोकपती त्रिपाठी मला सत्ताभ्रष्ट करण्याच्या प्रयत्नात आहेत, याची माहिती मला वर्तमानपत्रातूनच समजते. प्रत्यक्षात असे काही नाही.माझ्या आरोग्य मंत्र्याबरोबर माझे संबंध उत्तम आहेत.' अर्थात बोलताना हे असे बोलावेच लागते आणि प्रत्यक्षात मात्र जागरुक राहून हालचाली कराव्या लागतात. पक्षांतर्गत राजकारणाबाबत सिंगही दिल्लीशी संपर्क साधून आहेत. ताज्या बातमीप्रमाणे नको असलेली मंडळी वगळण्याचा परवाना त्यानी मिळवला असून आपल्या विरोधकाना ते लवकरच हिसका दाखवण्याची शक्यता आहे. केंद्रीय मजूरमंत्री नारायण दत्त तिवारी यांच्या काही पाठिराख्यांना आपल्या मंत्रिमंडळामध्ये जागा देऊन ते त्यांच्या विरोधात काम करणाऱ्या मंडळीना शह देण्याची शक्यता आहे. आरोग्यमंत्री लोकपती त्रिपाठी याना कदाचित वगळणार नाहीत. पण त्रासदायक वाटणाऱ्या अन्य दोन–तीन मंत्र्याना वगळून त्रिपाठी यांचे खाते बदलण्याच्या विचारात ते जरूर आहेत. विद्यमान मंत्री वगळणे आणि नवीन मंडळीना संधी देणे या दोन्ही गोष्टींचा हत्यारासारखा वापर करून मुख्यमंत्री आपले आसन मजबूत करून घेतील.

सिंग यांच्या कामाचा झपाटा मोठा आहे. फार मोठी जबाबदारी असूनही त्यानी कोणतेही दडपण घेतलेले नाही. उत्तर प्रदेशचे आजवरचे राजकारण गोंधळाचे आणि कमालीच्या बेशिस्तीचे. नियम आणि कायदा यापेक्षा व्यक्तिगत संबंध महत्त्वाचे. राज्याच्या मुख्यमंत्रिपदी कमलापती त्रिपाठी असोत, बहुगुणा असोत की अन्य कोणी असो, कारभारामधील ही ढिलाई कायम असते. नियमाची कदर करणारा पहिला मुख्यमंत्री म्हणून व्ही पी. सिंग यांच्या नावाचा उल्लेख केला जातो. उत्तर प्रदेशच्या राजकारणात मुरलेल्या मंडळीना त्यांची ही काम करण्याची पद्धती पसंत नसली तरी मुख्यमंत्री आपले याबाबतचे धोरण बदलण्यास तयार नाहीत. इंदिराजीच्या एक नातेवाईक शिला कौर यांचे नाव मुख्यमंत्रिपदाच्या खुर्चीसाठी घेतले जात असले तरी जोपर्यंत आपण सत्तेवर आहोत तोपर्यंत आपण आपल्याच पद्धतीने काम करणार, असे सिंग आग्रहाने सांगतात. काम करण्याच्या त्यांच्या या पद्धतीमुळे जसे काही शत्रू निर्माण झाले आहेत, तसेच मित्रही निर्माण झाले आहेत.

सिंग याना प्रसन्न व्यक्तिमत्त्व लाभले आहे. राजकीय वर्तुळामध्ये एक विचारवंत नेता, अशी ख्याती त्यानी संपादन केली असली तरी व्यावहारिक तडजोडीचे राजकारण ते करू शकणार नाहीत आणि म्हणूनच त्याना फारसे भवितव्य नाही, असा राकीय निरीक्षकाचा अंदाज आहे. कै. संजय गांधी आणि स्वत:चे एक नातेवाईक संजय सिंग यांच्या मेहरबानीमुळेच मुख्यमंत्रीपद मिळवलेल्या सिंग यानी ठाकूर जमातीचे राजकारण असेच चालू ठेवले तर त्याना लवकरच शह दिला जाईल. केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये त्याना सामावून घेऊन उत्तर प्रदेशाच्या मुख्यमंत्रीपदी अन्य कोणाची तरी वर्णी लावण्यात येईल अर्थात या अंदाजाना आज तरी काही अर्थ नाही. सर्व विद्यमान मुख्यमंत्र्यांना पूर्ण पाठिंबा देण्याचे इंदिराजीचे धोरण असून कोणत्याही स्वरूपाची बंडाळी खपवून घेण्याच्या मन:स्थितीमध्ये त्या नाहीत त्यांचे हे धोरण पुरेसे स्पष्ट झाल्याने व्ही. पी. सिंग जास्त आक्रमक झाले आहेत. 'वर्तमानपत्रवाल्यापासून आपण अलिप्त का राहता, असे केल्याने देशामधील या सगळ्यात मोठ्या राज्याला अपेक्षित प्रसिद्धी मिळू शकत नाही असे आपल्याला वाटत नाही का ?' असा प्रश्न विचारल्यावर मुख्यमंत्री म्हणतात, 'उत्तर प्रदेशच्या राजकारणाची आणि राज्यामधील एकंदर परिस्थितीची वर्तमानपत्रवाल्याना पुरेपूर माहिती आहे. मीच बापडा त्याबाबत अज्ञानी आहे. वर्तमानपत्रामधील बातम्या वाचूनच मला तथाकथित ब्राह्मण-लॉबीची माहिती झाली.'

प्रश्न : आपल्याला खरोखरच या गोष्टीची कल्पना नाही असे मानले तरी आरोग्यमंत्री त्रिपाठी असे काही करू शकतील असे वाटते का ?

उत्तर : हा तर अगदीच जर–तरच्या भाषेमधला काल्पनिक प्रश्न आहे. त्याला उत्तर देता येणार नाही.

प्रश्न : पक्षांतर्गत मतभेद नाहीतच, असे तर आपल्याला वाटत नाही ना ?

उत्तर : ज्याच्यावरून वादंग व्हावे असे मतभेद खरोखरच नाहीत. आता थोडी–फार कुरबूर, एखाद्या निर्णयाबाबत नाराजी यासारख्या गोष्टी आहेत; पण राजकारणामध्ये या गोष्टी अपरिहार्य

आहेत. त्या नाहीशा करता येणार नाहीत. तात्पर्य, दुधाला उकळी फुटतेच. फक्त ते उतू जाणार नाही एवढी दक्षता घ्यावी लागते. काही असमाधानी व्यक्ती आणि अनुत्तरित प्रश्न असावेच लागतात. त्यांचा सुयोग्य निचरा करणे हेच तर आमचे काम! त्यांचा समूळ विनाश करणे योग्यही नाही आणि तसे कोणी करतो म्हटले तर ते संभवनीय तर नाहीच, उलट करतो म्हणणाराची आहुती घेणारे आहे.

प्रश्न : आपल्या आरोग्य मंत्र्याबाबत आपण समाधानी आहात काय?

उत्तर : हो. अगदी पूर्ण समाधानी आहे. त्याचे व माझे संबंध उत्तम आहेत.

प्रश्न : त्याचे पिताजी त्यांना मुख्यमंत्री बनवण्याची महत्त्वाकांक्षा बाळगून आहेत. त्याबाबत आपणास काय वाटते?

उत्तर : त्याबाबत मी काय सांगणार? पण राजकारणामध्ये महत्त्वाकांक्षी असावेच लागते. तरी दुसऱ्यांबद्दल मी काय सांगणार? माझ्यापुरते विचाराल तर मी सांगेन की, मुख्यमंत्रीपद इतक्या लवकर माझ्या वाट्याला येईल असे काही मला वाटले नव्हते. पण आमच्या पक्षाच्या आमदारांनी एकमताने कै. संजय गांधी यांची निवड केली, त्यांना मोकळे करणे शक्य नाही हे पंतप्रधानांनी स्पष्ट केल्यावर नवीन नेता त्यांनीच निवडावा, असे त्यांना सुचवण्यात आले आणि इंदिराजींनीच माझी निवड केली!

प्रश्न : वर्तमानपत्रांच्या बाबतीत आपण काहीसे नाराज आहात आणि हेतुतः आपण त्यापासून दूर रहाता हे खरे आहे काय?

उत्तर : वर्तमानपत्रे अथवा या क्षेत्रामधील मंडळी याबाबत माझी कोणतीही नाराजी नाही, तसे असण्याचे काही कारणही नाही. मला कोणी भेटायला आले तर मी शक्यतो थोडा-फार वेळ देतो, परंतु उगाच पेपरवाल्याशी दोस्ती जमवण्यात अथवा केवळ प्रसिद्धीसाठी कोणाशी मैत्री करण्यात मला रस नाही. जनहिताच्या ज्या बातम्या, सूचना प्रसिद्ध होत असतात त्यावर माझे बारीक लक्ष असते आणि गरज असेल तेथे योग्य कारवाई व्हावी यासाठी योग्य हालचालीही चालू असतात. महत्त्वाची कात्रणे माझ्यासमोर ठेवण्यात येतात आणि राज्यामधील एकंदर परिस्थितीची कल्पना येण्यास मला त्याचा जरूर उपयोग होतो.

प्रश्न : वर्तमानपत्राकडून तुमच्या काय अपेक्षा आहेत?

उत्तर : सत्ताधाऱ्यांना असा प्रश्न विचारणे चुकीचे आहे; पण आता विचारला आहे म्हणून सांगतो. व्यक्तिशः माझ्यावर किंवा माझ्या शासनावर टीका करण्यात आली तर मला त्यात काही वावगे नाही. तथापि अशा स्वरूपाच्या लिखाणाला काही बैठक असेल, सबळ कारण असेल तरच मी त्याचा विचार करतो. आज अगदी तटस्थपणे विचार केला तरी असे लक्षात येते की, वर्तमानपत्रे कमालीची एकांगी असतात. राजकारणाला आपण इतके महत्त्व देतो की, सामाजिक-सांस्कृतिक बाबी उपेक्षित रहातात. शब्दापेक्षा काम महत्त्वाचे आहे, अशी माझी धारणा असल्याने काम करण्याच्याबाबतीत शब्द उपयोगी पडत असतील तेव्हाच मी त्याची दखल घेतो.

एखाद्या गोष्टीच्या प्रसिद्धीपेक्षा प्रत्यक्ष कृती अधिक महत्त्वाची असते. या मुद्द्याचे स्पष्टीकरण करण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी एक मजेशीर उदाहरण दिले. एखाद्या गावाला पाणीपुरवठा करण्याबाबत एखादी योजना शासनाजवळ तयार आहे. अशा योजनेला अगदी पत्रकार परिषद घेऊन आम्ही प्रसिद्धी दिली तरी ती योजना संबधित गावामधील गावकऱ्यापर्यंत पोचेल असे नव्हे; परंतु योजनेची कार्यवाही होऊन गावात पाणी आले आणि शेतीला पाणीपुरवठा होऊ लागला की, ही गोष्ट गावकऱ्याच्या लक्षात येते. तात्पर्य काय तर शब्दापेक्षा प्रत्यक्ष काम महत्त्वाचे आहे!

प्रश्न : आपण वारवार दिल्लीला जाता-नव्हे आपण दिल्लीत राहून उत्तर प्रदेशचे राज्य चालवता, असा जो आक्षेप घेतला जातो त्याबाबत आपले काय मत आहे?

उत्तर : ( आतापर्यंत शांतपणे हसत-खेळत उत्तरे देणारे मुख्यमंत्री या प्रश्नावरील आपली प्रतिक्रिया काहीसे रागावूनच व्यक्त करत होते ) मी दिल्लीला किती वेळा जातो ही गोष्ट महत्त्वाची नाही, तर माझे शासन कसे आहे ही गोष्ट जास्त महत्त्वाची आहे. राज्याची किती तरी कामे दिल्लीत अडकून पडलेली असतात. पत्रव्यवहाराने या कामांना अपेक्षित गती मिळू शकत नाही. राज्याचा मुख्यमंत्री मुद्दाम या कामासाठी दिल्लीस आला आहे याची जाणीव आपण करून दिली तर कामाला वेग येतो. पत्रव्यवहारातून जे काम सहा महिन्यात होणार नाही ते काम प्रत्यक्ष भेटीमुळे केवळ महिन्या-दोन महिन्यात होऊ शकते, असा माझा अनुभव आहे.

प्रश्न : याचा अर्थ केंद्रीय शासन अकार्यक्षम आहे असा होत नाही का?

उत्तर : (या प्रश्नाबरोबरच पहिली चिडचिड नाहीशी झाली. मुख्यमंत्री खळखळून हसून म्हणाले) तुम्ही लोक फार तडका-फडकी निर्णय देता. केंद्रीय शासन जराही अकार्यक्षम नाही. तेथे कामाचा पसारा एवढा अवाढव्य आहे की, समोर जाऊन काम करून घेणे मी जास्त पसंत करतो केंद्रीय मंत्र्यांशी तर संपर्क ठेवतोच, पण गरज तेव्हा वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटून माझ्या राज्याची कामे करवून घेतो. माझे काम होण्यात ज्याची मदत होईल त्याला भेटण्यात मला जराही संकोच वाटत नाही

प्रश्न : आपले एक नातेवाईक संजय सिंग शासकीय कामामध्ये अवाजवी हस्तक्षेप करतात असा आक्षेप आहे, त्याबाबत आपणास काय म्हणायचे आहे?

उत्तर : हा आक्षेप सर्वथैव चुकीचा आहे, एवढेच मी म्हणू शकतो. असा हस्तक्षेप होतो हे कोणी पुराव्यानिशी दाखवून दिले तर मी जरूर कारवाई करेन.

प्रश्न : शिला कौल लवकरच आपली जागा घेतील असे बोलले जाते.

उत्तर : त्या ही जबाबदारी चांगल्या प्रकारे पार पाडू शकतील असे मला वाटते.

प्रश्न : उत्तर प्रदेशामधील अनेक प्रश्न हे राज्य अवाजवी मोठे असल्यामुळे निर्माण झाले आहेत. उत्तर प्रदेशाचे विभाजन केले तर अनेक फायदे मिळू शकतील असा जाणकारांचा अंदाज आहे. याबाबत आपली प्रतिक्रिया काय आहे?

उत्तर : उत्तर प्रदेशाची विशालता ही राज्याची जशी कमजोरी आहे, तशीच फार मोठी ताकदही आहे. एका भागामधील समृद्धतेचा फायदा दुसऱ्या भागाला मिळू शकतो. खेरीज उत्तर प्रदेश हे जवळजवळ असे एकमेव राज्य आहे की जेथे प्रादेशिक तणाव नाहीत.

प्रश्न : राज्याचे विभाजन केले तर केंद्रस्थानी पकड ढिली पडेल असे वाटत असल्याने राजकारणी मंडळी उत्तर प्रदेशाच्या विभाजनाला विरोध करतात, हे खरे का ?

उत्तर : मला नाही तसे वाटत.

प्रश्न : छप्पन्न जिल्हे असलेले हे राज्य एवढे प्रचंड आहे की राज्याच्या मुख्यमंत्र्याला या जिल्ह्यांची नावे सागणेही जमणार नाही, असे उद्गार याच राज्याच्या एका माजी मुख्यमंत्र्याने काढले आहेत.

उत्तर : ही अगदीच बालिश प्रतिक्रिया आहे. देश मोठा असल्याने पंतप्रधानांना देशामधील राज्यांची नावे आठवणार नाहीत असे म्हणण्यातलाच हा प्रकार आहे. आता याबाबतचे प्रॅक्टिकल उत्तर द्यायचे झाले तर एवढेच म्हणता येईल की, मला माझ्या राज्यामधल्या सर्व जिल्ह्याची नावे माहीत आहेत आणि आजवर मी पंचवीस जिल्ह्याना भेटी दिल्या आहेत. राज्यामधील सर्व जिल्ह्याशी माझा उत्तम संपर्क आहे.

प्रश्न : औद्योगिकदृष्टया विचार करता उत्तर प्रदेश अविकसित असण्याचे कारण काय ?

उत्तर : 'औद्योगिक विकास' या शब्दाचा अर्थ तुम्ही कसा घेता हे जास्त महत्त्वाचे आहे. औद्योगिक विकासाचा विचार करताना कच्ची साधनसामग्री किती उपलब्ध आहे हे विशेष महत्त्वाचे आहे. एखादा नवीन उद्योग सुरू करताना त्याबरोबर सहजगत्या आणखी काही जोडउद्योग सुरू झाले पाहिजेत असे मला वाटते. औद्योगिक विकास होण्याच्या दृष्टीने ही गोष्ट विशेष महत्त्वाची आहे असे मला वाटते. चार मोठे उद्योगधंदे असण्यापेक्षा मोठ्या उद्योगधंद्याबरोबरच छोटया उद्योगाचे जाळे विणले गेले तरच रोजगार वाढू शकतो.


# व्हान गॉग

'लस्ट फॉर लाइफ' या आयर्व्हिंग स्टोनच्या जगप्रसिद्ध कलाकृतीचा मराठी अनुवाद

अनुवादिका : माधुरी पुरंदरे

प्रकाशक

प्रसाद पुरंदरे, पर्वती, पुणे


उत्तर प्रदेशात आजवर अशा पद्धतीने विचार झालेला नाही.

प्रश्न : राज्याच्या हिताच्या दृष्टीने मोठ्या उद्योगपतींशी संपर्क ठेवणे आपल्याला आवश्यक वाटते का ?

उत्तर : गरज असेल तेवढा संपर्क जरूर ठेवावा; परंतु सोयीसवलती मिळाव्यात अथवा नियम बाजूला सारून विशेष मेहरबानी करावी अशा अपेक्षेने कोणी जवळ येत असेल तर मात्र कठोर धोरण स्वीकारून अशा मंडळींना धडा शिकवावा !

प्रश्न : औद्योगिक विकासाबाबत आपले धोरण काय आहे ?

उत्तर : औद्योगिक विकासाच्या माझ्या कल्पना मी आत्ताच सांगितल्या आहेत आणि त्याच दृष्टीने माझे प्रयत्न चालू आहेत. नवीन योजनांच्या बाबतीत आम्ही दिरंगाई कटाक्षाने टाळतो. उद्योगधंद्याबाबतच्या अर्जांची छाननी एक महिन्याच्या अवधीत पूर्ण होते. उद्योगपतींनी येथे आपले नवीन व्यवसाय सुरू करावेत यासाठी अनेक सवलती देण्यात आल्या असून आम्हाला अपेक्षेप्रमाणे प्रतिसाद मिळत आहे.

अलीकडेच झालेल्या किसान–मेळाव्याबाबत प्रतिक्रिया विचारून मुलाखतीचा समारोप केला असता मुख्यमंत्री म्हणाले, 'किसान मेळाव्याला राजकीय महत्त्व आहेच. अशा मेळाव्यांना केवळ आर्थिक अडचणी सोडवून आकार देता येत नाही, तर संबंधिताचा खराखुरा पाठिंबा लागतो.' □

## □ ऐशियन गेम्स–१९८२

राजकीय सत्तांतराचा क्रीडाक्षेत्रावरही कसा परिणाम होत असतो याचे उत्तम उदाहरण म्हणजे १९८२ साली दिल्ली येथे होणाऱ्या ऐशियन गेम्सबाबत चाललेला सावळा गोधळ ! या स्पर्धा भारतामध्ये घेण्याचा निर्णय १९७६ साली घेण्यात आला. ज्या वेळी भारताने या स्पर्धा भरवण्याबाबत तयारी दर्शवली त्या वेळी सत्तास्थानी कॉंग्रेस पक्ष होता. पुढे या स्पर्धा घ्याव्यात की घेऊ नयेत याचा घोळ त्या वेळी सत्तास्थानी असलेल्या जनता सरकारने घातला. चांगले वर्षसहा महिने प्रकरण घोळवल्यावर या स्पर्धा घेण्याबाबतचा निर्णय होऊन तयारी सुरू झाली. ऐशियन गेम्सच्या व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी विजयकुमार मल्होत्रा यांची नेमणूक करण्यात आली. कामाला प्रारंभ झाला खरा, परंतु प्रत्येक गोष्टीत दिरंगाई इतकी होत होती की, कामाला गती म्हणून येत नव्हती. त्यात जनता शासन अस्थिर झाले. पुढे सरकार कोसळले आणि चरणसिंग यांचे काळजीवाहू सरकार आले. स्थित्यंतराच्या या प्रक्रियेमध्येच राजकारणी मंडळी इतकी व्यग्र होती की ऐशियन गेम्सबाबतचे काम जवळजवळ ठप्प झाले. पुढे इंदिरा सरकार आल्यावरती अल्पावधीमध्ये काम पूर्ण होईल का, याबाबत चर्चा सुरू झाली. या स्पर्धांवर पाण्यासारखा पैसा खर्च होणार असल्याने अर्थ मंत्रालयही याबाबत तसे उदासीन होते. अखेरीस काही तरी निर्णय करणे जरूर होते. कारण स्पर्धा अक्षरशः डोक्यावर येऊन ठेपल्या होत्या. मंत्रिमंडळाचा निर्णय झाला की स्पर्धा भरवायच्या. व्यवस्थापन समितीची पुर्नरचना करण्यात येऊन मल्होत्रा यांची उचलबांगडी करण्यात

झाली. या नवव्या अेशियन गेम्ससाठी सुमारे वीस कोटी रुपये खर्च पडतील असा अंदाज होता; पण आता प्रत्यक्षात सत्तर कोटी रुपयांहून जास्त रक्कम खर्ची पडेल असे दिसते. आता एवढी मोठी रक्कम खर्ची टाकायची म्हणजे नियंत्रण ठेवण्यासाठी मंत्री हवाच. म्हणून मल्होत्रा यांच्या जागी विद्याचरण शुक्ला यांना आणण्यात आले. व्यवस्थापन समितीचे माजी अध्यक्ष मल्होत्रा अजूनही आपणच अध्यक्ष असल्याचे सांगतात आणि खुशाल पत्रकार परिषदा घेऊन व्ही. सी. शुक्ला यांच्या समितीवर टीका करतात.

कोणत्याही परिस्थितीमध्ये स्पर्धा झाल्याच पाहिजेत असे समजून नवीन समिती काम करत आहे. लोधी हॉस्पिटलजवळ ७५ हजार प्रेक्षक बसू शकतील असे एक स्टेडियम बांधण्याचे काम सुरू असून या कामाला आता चांगला वेग आला आहे. तसेच जेथे १९५१ साली अेशियन गेम्स घेण्यात आले होते त्या नॅशनल स्टेडियमची डागडुजी सुरू असून तेथे हॉकीचे सामने घेण्यात यावेत या दृष्टीने तयारी सुरू आहे.

नवीन व्यवस्थापन समितीच्या कार्यपद्धतीवर विजयकुमार मल्होत्रा यांनी टीकेची झोड उठवली असली तरी क्रीडा क्षेत्रातही त्याबाबत अनुकूल प्रतिक्रिया नाही. क्रीडा क्षेत्रामध्ये राजकारण आणल्याचा आरोप मल्होत्रा करत असले तरी प्रत्यक्षात तेही क्रीडाविषयक कार्यापेक्षा विद्यमान समितीवर टीका करण्यातच गर्क झालेले दिसतात. खेरीज स्टेडियम बांधकामाचा निर्णय मल्होत्रा अध्यक्ष असतानाच घेण्यात आला होता. स्टेडियम बांधकामाबाबतचे कॉन्ट्रॅक्ट ज्या पद्धतीने दिले गेले त्याबाबत नाराजी व्यक्त करून तेव्हाच्या जनता सरकारमधील एक मंत्री सिकंदर बख्त यांनी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता, या गोष्टीचाही मल्होत्रा यांना विसर पडलेला दिसतो.

अेशियन गेम्समधील काही स्पर्धा हरियानामध्ये घेण्याच्या निर्णयाबाबतची मल्होत्रा यांची टीका वाजवी वाटते. हरियाना सरकारने तर त निमित्त करून कित्येक अधिकाऱ्यांना मॉस्को ऑलिम्पिकची वारी करण्याची संधी दिली आणि लाखो रुपये खर्ची घातले. आज तरी अेशियन गेम्स दिल्लीतच होण्याची जास्त शक्यता आहे. स्पर्धा झाल्या पाहिजेत आणि त्या यशस्वी झाल्या पाहिजेत या दृष्टीने शासन प्रयत्न करत आहे. नवीन समितीही त्याच दृष्टीने कार्य करत असताना एके काळी समितीचे अध्यक्षपद भूषवणाऱ्या मल्होत्रा यांनी टीकेची झोड उठवणे सयुक्तिक वाटत नाही. स्टेडियम हवे की नको, याबाबत वाद घालणेही सयुक्तिक नाही. कारण मुळातच क्रीडाविषयक सुविधा अत्यंत कमी प्रमाणात उपलब्ध असताना नवीन स्टेडियम नको, असे क्रीडा क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तीने म्हणणे बेजबाबदारपणाचे आहे.

अेशियन गेम्ससाठी ज्या सुविधा आवश्यक आहेत त्या उपलब्ध करून देण्यासाठी पुरेसा अवधी नाही. युद्धपातळीवरून तयारी केली तरच थोडा-फार निभाव लागण्याची शक्यता असताना सर्व संबंधितांनी सहकार्याचा हात पुढे केला पाहिजे. वादविवाद आणि चर्चेला आता वेळ नाही. स्पर्धा होणारच, त्या झाल्याही पाहिजेत अशी परिस्थिती असल्याने आता अेशियन गेम्स जास्तीत जास्त यशस्वी कसे होतील यासाठीच प्रयत्न झाले पाहिजेत. □

"एक वही संपली दुसरी आणा..... पुस्तक फाटलं नवीन आणा.... अरे काय झाड लावलंय काय पैशाचं इथं...? आमच्या वेळी सातवी पर्यंत एक पाटी वापरत असू आम्ही"

तुमच्या वेळची गोष्ट वेगळी होती. काळ बदललाय....
शिक्षणपद्धती बदललीय. शाळेचं दप्तर नेण्यासाठी काही दिवसांनी हमाल करावा लागेल अशी परिस्थिती येईल. आपल्या नेहमीच्या खर्चावर पडणारा ताण असं मुलांवर चिडचिड करून थोडाच कमी होणार आहे?

असं कां नाही करत? आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी आमच्याकडे एक रिकरिंग अकौंट उघडा.
त्यात नियमाने पैसे भरा. बघा, त्या साठलेल्या रकमेतून त्याच्या वह्या-पुस्तकांचा खर्च भागतो की नाही ते.

आपल्या उत्कर्षातील साथीदार
दि सांगली बँक लि.
रजि. ऑफीस - राजवाडा चौक, सांगली
चेअरमन : एम. आर. रणदिवे

पैशाचं काय झाड लावलंय इथं



## गुजरातच्या मेडिकल विद्यार्थ्यांचे आंदोलन

# ' डॉक्टरांनीच काय म्हणून ' त्याग ' करायचा ? इंजिनियर जातो खेड्यात ? करतो गरिबांची सेवा ? '

## दाढुमियांच्या डायरीतील पाने ( हप्ता तिसरा )

### एक मार्च १९८१

आज रविवार. आज सारे पेपर्स १५३९ कोटी रुपयांच्या तुटीच्या अंदाज-पत्रकाने भरलेले आहेत. दुसरी बात नाही !

लोकसत्तेने मात्र मधल्या पानावर काल बडोद्यातील डॉक्टर्स, वकील वगैरे व्यवसायी मंडळींनी व विद्यार्थ्यांनी जो मूक मोर्चा काढला त्याचा मोठा फोटो दिला आहे.

मी काल या मोर्चात गेलोच नाही !

फार मोठा मोर्चा होता असे माझ्या मित्रांनी, सांगितले.

' वेस्ट ऑफ टाइम ' वाटतो हा मला. त्यापेक्षा घरी बसून काही चागले वाचावे किंवा लिहावे.

कदाचित २७ तारखेस मी दवाखाना उघडा ठेवला होता त्याचा ' गिल्ट कॉम्प्लेक्स ' माझ्या मनात खोलवर रुतला असेल. लोक विचारतील,

' क्यूं भाई, ब्रुटस, दाऊ टू ? '

मेडिकल युनियनचा मी कार्यकारी सभासद आहे.

पण माझा स्टँड क्लिअर होता. मी सुरतेस फोन केला होता. सुरतचे सर्व व्यवहार सुरळीत चालले होते. दवाखाने उघडे होते. व्यापार व्यवस्थित चालू होता. मी २६ तारखेस दवाखाना बद ठेवला होता आदेशाप्रमाणे; पण दोन दिवस दवाखाना बंद ठेवायचा, हे माझ्या मनाला पटत नाही. जे पटत नाही ते करायचे नाही हा माझा मराठी बाणा !

सुदैवाने किरीट वसावडा व डॉ. व्यास माझ्या मताचे होते.

पण शेजारी असलेल्या डॉक्टराने कळ फिरवलीच ! प्रेसिडेंटला त्याने फोन केलाच, ' क्यूं भाई, क्या बात है ? हा डॉक्टर तुझा आदेश पाळत नाही त्याच्याविरुद्ध ॲक्शन घ्या, ॲक्शन ! '

मला दवाखान्यात फोनवर फोन.

मी ज्याची नावे घेतली त्यांचेही फोन ! ' अबे खुद मरना है तो मरो, हमको साथमे लेकर क्यूं डुबते हो भाई ? '

मी म्हटलं जे म्हणायचं ते म्हणा. ब्लॅक शिप म्हणा की व्हाइट शिप म्हणा; पण मनाला हे पटत नाही !

उगाच का रोग्याना शिक्षा ?

बाहेरगावच्या लोकांना मी तारखा दिलेल्या असतात मूळव्या-धीच्या पेनलेस ऑपरेशनशिवायच्या क्युअरसाठी. त्यांनी का करायचे ?

आणि मी स्टेशनरोडवरील दवाखाना बंद ठेवला तरी रोगी घरी हॉस्पिटल आहे तिथे येतातच !

मित्रांनी सांगितले, ' मार बंडल आणि घरी चालू ठेव ! '

पण का ही फसवाफसवी ?

अप्रिय ठरलो तरी हरकत नाही, काय व्हायचं ते होऊ द्या, म्हटलं बघू या, खरच बोलायचं व मनाला जे पटते तेच करायचं.

काही विशेष घडले नाही.

साऱ्यांनीच चोरी-चोरी केली होती. फक्त ते उघडपणे तसे बोलू शकत नव्हते. डिसिप्लीनरी ॲक्शन कोणाकोणावर घेणार ?

सारेच चोर !

म्हणून तुम भी चूप और हम भी !

### दोन मार्च

ह्या विमला पाटील म्हणजे ' ग्रेट ' आहेत. मागे आपण ' मनोहर 'मध्ये त्यांची मुलाखत प्रसिद्ध केली होती. नेहमीच हसत-मुख, धीट, फटकळ व नेमक्या मुद्द्याशी गाठ.

मागे बडोद्यास आल्या होत्या त्या वेळी आपला मुलगा मेडिकलला आहे असे त्यानी सागितल्याचे मला आठवते.

म्हणून मी मुबईच्या एका नुकत्याच पास झालेल्या तरुण डॉक्ट-रला त्याच्याकडे मार्गदर्शनासाठी धाडला होता. खूप उंच, उच आदर्शवादी कल्पना होत्या त्याच्या डोक्यात; पण त्याला धरतीवर आणून सोडला या ' ग्रेट ' बाईंनी. त्या डॉक्टरचे पुढे काय झाले ते कळले नाही.

या विमल पाटलांनी ' टाइम्स 'मध्ये पत्र लिहिले आहे. २५ फेब्रुवारीच्या टाइम्समधील गिरिलाल जैन यानी रिझर्व्हेशन ट्रॅप (राखीव सापळा) हा सुदर लेख लिहिला होता. म्हणून बाईंनी हा उपद्व्याप केला आहे. पोस्ट ग्रॅज्युएट मेडिकल अभ्यासासाठी कोणत्या

प्रकारचे विद्यार्थी अहमदाबादेत येतात त्याची चौकशी बाईंनी केली व हे पत्र लिहिले आहे. बाप रे! काय भयंकर स्फोट उडविला आहे सत्याचा या बाईंनी ? बी. सी. मुले व मुली जळफळतील ! म्हणा, फेमिनाचे वाचक बी. सी. थोडेच असतात ?

बाईंनी चार एम. डी., एम. एस. वाल्या विद्यार्थ्यांची सामाजिक छाननी केली आहे. डॉ. आर. के. चावडा यांचे वडील खेमचंद चावडा हे पूर्वी खासदार होते. डॉ. कु. भारती यादवचे वडील बाहरेन विमानतळावर मोठे अधिकारी आहेत. डॉ. सुधीर मकवानाचे मोठे बंधू स्टेट बँक ऑफ इंडियाचे हजारावर जास्त पगार मिळविणारे अधिकारी आहेत आणि डॉ. लेऊवाचे वडील तर गुजराथ विधानसभेचे भूतपूर्व स्पीकर होते !

आता बोला.

हे का बी. सी. ? कोणत्या अर्थाने मागासलेले ?

पण माझे मन म्हणते, आर्थिकदृष्ट्या हे डॉक्टर्स भले खूप श्रीमंत असतील, पण सांस्कृतिकदृष्ट्या तर मागासलेले खरे ना ?

विमला पाटलानी अहमदाबादेची परिस्थिती दिली आहे पेपरात, आपण बडोद्याची द्यावी असे मनात येते.

मी मिलिंदास दौडवतो. तासाभरात तो परत येतो. पाच पोस्ट ग्रॅज्युएटचे बी. सी. विद्यार्थी. त्यातील दोन सत्तर टक्क्यावरचे विद्यार्थी. एक गरीब व मध्यमवर्गीय. इतर तीन बी सी. श्रीमंत विद्यार्थी. अभ्यासात ढफोळ. पुढच्या वर्षी जी मुले येणार त्यांच्यात साऱ्या श्रीमंताचीच पोरे ! एक डॉक्टरचा, एक आमदाराचा, एक अधिकाऱ्याचा व एक सामाजिक कार्यकर्त्याचा. अभ्यासात एकदम ढ ! पुढाऱ्याच्या मुलाला हुषार असून करायचे आहे काय ?

मी टाइम्सला पत्र लिहायला बसतो.

पण माघार घेतो.

विमला पाटलांचा 'थिसिस' संपूर्ण खरा नसतो. दोन मुले गरीब असतात आणि तीही सत्तर टक्केवाली.

पत्र प्रसिद्ध करून उगीच आपले हसू करवून कशाला घ्यायचे ?

मी वेलजीला सांगतो, टाइपरायटरचे झाकण बंद कर व टाइपरायटर परत जागच्या जागी ठेवून दे

वेलजी बी. सी. बिचाऱ्याला ठाऊकही नसते, त्याच्या जातभाईंविरुद्ध बाहेर काय धमाल चालविली आहे सवर्णीयांनी !

¤

टाइम्स खाली ठेवला

आणि गुजराथी लोकसत्ता हाती घेतला.

टाइम्स तर साऱ्या बातम्या दाबून टाकतो. पूर्वी ब्रिटिशाचा चमचा, आता सत्ताधारी काँग्रेसचा !

लोकसत्तेतील एक बातमी वाचून मला फार फार बरे वाटले.

राखीव जागाचे हे आदोलन मागे खेचण्याचे विनोबानी गुजराथच्या विद्यार्थ्यांना अपील केले आहे

विनोबांची बरेच दिवसात काहीच वातमी नव्हती. मला भीती वाटली, खरेच, शून्यात गेले की काय ?

पण नाही, विनोबा आमच्यातच आहेत, व्हेरी मच वुइथ अस, रादर, वुइथ इंदिरा गांधी.

शातिपूर्ण वातावरण निर्माण करण्यासाठी हे आवाहन केले गेले होते.

पण भारतात रोज सर्वत्र दंगे, लूटमार, दरोडे, चोऱ्या होत आहेत. मुंबईत तर खून नित्याचे झाले आहेत. आठवड्यास एखादा खून वा दरोडा नसेल तर पेपर्स अगदीच अळणी वाटतात !

विनोबा ह्या गुन्हेगाराना का नाही अपील करीत ? माझ्या मनात खोडकर विचार आला.

जय जगत, पण हे जगत सत लोकाचे असावे, शिव लोकाचे असावे, सुदर लोकाचे असावे, असे त्याना वाटत असेल

म्हणजे सवर्णांचे !

मी माझे विचार मनातल्या मनात दडपून टाकले. जय जगत !

¤

विनोबाचे सोडा, पण या सरकारी नोकरानी काय चालविले आहे ? सचिवालय सोडले तर सर्व सरकारी कार्यालये, बहुतेक सर्व बँका, विमा निगमाच्या शाखा, पंचायत कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था—या सर्वांचे कर्मचारी आज सामूहिक रजेवर गेले आहेत. राजकोट, बडोदे, जामनगर, भडोच, भावनगर, जुनागढ व कच्छ जिल्ह्यातील सर्वच्या सर्व कर्मचारी रजेवर गेले आहेत. कोर्टातील वकील व म्युनिसिपालिटीतील कॉर्पोरेटर्सदेखील या मेडिकलच्या विद्यार्थ्यांना पाठिंबा देण्यासाठी आज रजेवर आहेत. मात्र, सर्वत्र शांतता आहे. कोठेही हिंसा घडलेली नाही !

शरद जोशीचे 'रास्ता रोको'चे तत्त्वज्ञान थेट भावनगरपर्यंत पोचले आहे भावनगर म्हणजे सौराष्ट्राचे पुणेच. राजकोटमध्ये यास संपूर्ण पाठिंबा मिळाला नाहीच. सुरतेत तीच भानगड आहे. अर्धी दुकाने उघडी आहेत. अर्धे दवाखानेदेखील.

आम्ही मात्र आमचे दवाखाने बंद ठेवले आहेत.

करायचे काय हा प्रश्न आहे.

लेखनही काही होत नाही अशा धमालीच्या वातावरणात.

फोनचे बिल मात्र चांगले दणकून येणार आहे काही उद्योग नाही म्हणजे फिरवा टेलिफोन. तुमच्या सुरतला काय चालले आहे व राजकोटची परिस्थिती कशी आहे ?

टेलिफोनखाते अशा वेळी बंद पाडायला पाहिजे; पण हे एस. टी. डी. आपोआप चालते. आली का पंचाईत ?

मग अशा 'बंद'च्या दिवशी टेलिफोन फुकट पाहिजेत !

सिनेमा बंद.

कॉलेजेस बंद.

शाळा बंद.

मग करायचे काय ?

डॉ. व्यास मिस्किलपणे टेलिफोनवर सागत होते, प्रेमात असलेल्या कॉलेजच्या पोरापोरींचे हाल होत असतील. कॉलेजे बद, सिनेमागृहे बंद मग यानी प्रेम कोठे करायचे ?

नशीब, रिक्षा, बसेस, टॅक्सीज व्यवस्थित चालू आहेत.

नाही तर सारे रस्ते ओसाड दिसतात.

दुकानेही बंद.

म्हणजे शॉपिंग नाही.

शिक्षा आहे नुसते घरी बसण्याची.

पेपरवाल्याची मजा आहे. गुजराथ सरकारने केवढ्या मोठ्या जाहिराती दिल्या आहेत ! निरनिराळ्या नावाखाली आहेत, पण

उघडपणे गुजराथ सरकारची मदत दिसते आहे त्यांना. काही मजूर पुढाऱ्यांची जाहिरात आहे–' आमच्या रोजीरोटीचे काय ?' बंद म्हटला की कारखाने बंद. खरंच, या कामगारानी काय खायचे ? म्हणजे त्यांचा त्याग सर्वांत मोठा ! विशेषतः रंगारी, नळ फिट करणारे प्लंबर्स, सुतार, गवंडी. थोडाक्यात, रोजची मजुरी करून त्यावर जगणारे जीव. मजुरी नाही तर खातील काय ?

मुख्यमंत्री माधवसिंग सोळंकी यांच्या नावे दिलेली जाहिरात, गुजराथ सरकारदेखील कंटाळून गेले आहे त्याची सूचक नोंद वाटते. ' सरकार व्यवहारी डकेल लाववा तैयार छे, ' असे ती जाहिरात म्हणते; पण त्या जाहिरातीत ' मिया पडे तो टांग उची 'च आहे. आम्ही दलितांचे भले किती करीत आहोत यावरच, म्हणजे मतांची बँक डोळयासमोर ठेवून दिलेली ती जाहिरात आहे.

आणखी एक जाहिरात जास्त बोलकी आहे. तिचा मथळा आहे, ' क हे वाय छे के.' त्याचा अर्थ, असे म्हणतात की–

' कोणास खंजीर खुपसतात,
कोणाच्या मानेवर वार केले जातात,
कोणाच्या पाठीवर हॉकी मारतात,
कोणाच्या डोक्यावर दगडांचा वर्षाव होतो,
कोणाची कांडे कापली जातात,
तर कोणास जिवंत जाळले जाते.
माणूस विचारवंत प्राणी आहे
का हिंस्त्र पशू आहे ?
या क्षणी तरी हिंस्त्र पशू वाटतो तो.
कदाचित् जगातील प्राणी शरमेने आपली मान खाली घालीत असतील–'

आणखी एक जाहिरात जास्त बोलकी आहे. मथळा आहे, ' पछात वर्गना अनुस्नातक तबी बो खरेखर केटला ?' म्हणजे बी. सी. विद्यार्थ्यांचे प्रमाण किती ?

जाहिरात मोठी आहे.

१०६ मेडिकल कॉलेज प्राध्यापकांपैकी बी. सी. प्राध्यापक फक्त एक आहे !

ॲसि. मेडिकल प्राध्यापकांच्या जागा आहेत २९३. या २९३ पैकी पाचजण बी. सी. आहेत.

टयूटर्स २३७. त्यातले बी. सी. सतरा, एस. सी. पंधरा व एस. टी. दोन.

जाहिरातीच्या शेवटी म्हटले आहे, म्हणजे ७३७ जागांपैकी शेडयूल्ड कास्टना २२ व शेडयूल्ड ट्राइब्ज्ना २ जागा दिल्या आहेत जाहिरात पुन्हा मतकेंद्रित होती. ही जाहिरात वाचून कोणीही बी. सी. म्हणेल, ' अरे, बावीस जागा आम्हाला मिळाल्या तर तुमच्या पोटात दुखते मग जन्मभर, पिढयान् पिढया या जागेवर आम्ही तुमची मुले पहातोय्, आमची आतडी शिल्लक का रहावी ?'

ही जाहिरात मी या तरुण डॉक्टराना दाखविली. त्यांच्या मनावर त्याचा काहीच परिणाम झालेला वाटला नाही. मला आश्चर्य वाटले. त्यांच्याशी मी चर्चा केली. ते म्हणाले, ' त्यात काय आहे ? तुम्ही बी. सी. लोकाना वाईट वागविलेले पाहिले असेल, म्हणून तुमच्या मनात ' गिल्ट कॉम्प्लेक्स ' असेल. आम्ही त्यांना सतत सवलती उपटताना पाहतोय. आम्हाला असला खोटा ' गिल्ट कॉम्प्लेक्स ' नाही. तुम्ही काहीही म्हणा, आमचा प्रश्न एकच. लष्करात हे राखीव कुरण का ठेवीत नाहीत ? पायलट्समध्ये का नाही ? क्रिकेटच्या टीममध्ये का नाही ? कारण तेथे जात महत्त्वाची नाही, परिणाम महत्त्वाचा !

आम्ही तेच म्हणतो आहे.

एम. डी., एम एस. डॉक्टरच्या बाबतीत आम्ही तेच म्हणतो आहे. जात तेथे महत्त्वाची नाही. तत्त्वाचा प्रश्न आहे. तुम्ही समजून का घेत नाही ? येथे गुणवत्ता श्रेष्ठ आहे.

चागला डॉक्टर पाहिजे आहे ना ? मग तो बी. सी. च पाहिजे असा कशाला आग्रह पाहिजे तुमचा ?

आणि हा राजकीय बकवास तुम्ही सहन केला, आम्ही नाही करणार !

तुम्हाला बी. सी. लोकाचा उद्धार करायचा आहे ना ? मग त्यासाठी त्यांच्यापैकी डॉक्टर्सच बनविले म्हणजे फक्त त्यांचा उद्धार होईल ? तुम्हाला त्यांचा उद्धार करायचा असेल तर त्यांच्यातील सरसकट शिक्षणाचे प्रमाण वाढवा ना. शाळेत प्रत्येक बी. सी. जातो का नाही ते पहा ना. कॉलेजातील शिक्षण तो घेतो का नाही ते पहा ना. एकदम डॉक्टर–इंजिनियर करायला निघालात ? •

१८५७ पासून १९८० पर्यंत इंग्रजी शिक्षणाच्या किती पिढया झाल्या सवर्णांच्या ? आणि तेवढया झाल्यावर डॉक्टरलोकांची एवढी संख्या झाली ना ? मग अवर्णांना तेवढया पिढया, चला, त्याच्या अर्ध्या पिढयाना जेव्हा तुम्ही जनरल शिक्षण द्याल तेव्हा तुम्हाला ही प्रगती आढळेल, एरवी नाही ! त्याचा बेज ब्रॉड करायची भाषा करा ना. एकदम उडी इंजिनियर व डॉक्टर व्हायची ?'

मला मोरारजीभाई आठवले.

तुम्हाला तुमच्या पूर्वजांच्या चुकीचे प्रायश्चित्त घेतलेच पाहिजे. योग्य ती किंमत दिलीच पाहिजे !

पण गुणवत्ता ?

मोरारजी खरे का ही तरुण पिढी ?

माझे मन पूर्णपणे गोंधळून गेले आहे.

' दलितांचे राजकारण ' ग्रंथ लिहूनही माझे मन गोंधळलेले ? मी सवर्ण आहे ना ?

म्हणून असेल कदाचित.

---

## तीन मार्च

---

काल अहमदाबाद बंद होते. ७० टक्के कर्मचाऱ्यानी कॅज्युअल रजा घेऊन अहमदाबाद पॅरलाईज् करून सोडले होते. फक्त गाडया, रिक्षा व बसेस नेहमीप्रमाणे चालू होत्या. तिघाना काल एन. एस. ए. (National Security Act) खाली पकडले होते. त्या तिघात प्रवीण रावळ हा जनता पक्षाचा कॉर्पोरेटरदेखील होता. पोस्टाचा बटवडा झाला नाही. त्यामुळे साऱ्या शहरावर सुतकी कळा पसरली होती नवरंगपुऱ्यात थोडी धमाल झाली. चौदा जणांची धरपकड केली. त्यात बारा स्त्रिया होत्या. पोलिसांच्या अत्याचाराविरुद्ध या लोकांनी मोर्चा काढला होता.

माधवसिंग सोळंकी सरकार हादरून गेले आहे. त्यांच्या डोळ्यांसमोर नर्मदेसारखे मोठे मोठे प्रकल्प उभे आहेत. किती तरी शेकडो कोटी रुपयांचे प्रकल्प! म्हणजे केवढी खिरापत व केवढा प्रसाद! तो स्वत:च्या डोळ्यासमोर दुसऱ्या कोणाच्या हाती सुखासुखी जाऊ द्यायचा म्हणजे किती दु:खदायक घटना असेल, नाही का?

योजनाकेंद्रमंत्री नारायण दत्त तिवारी अहमदाबादेत आले आहेत. त्यांनी मुख्यमंत्र्यांना पुन्हा मुलांशी बोलणी सुरू करा असा मंत्र दिला. त्याप्रमाणे मुलांच्या वतीने त्यांचा प्रमुख डॉ. मृगेश वैष्णव व मुख्यमंत्री यांची बोलणी झाली. मुले कोणत्याही राजकीय मोहास बधतील असे वाटत नाही.

'अहमदाबादेत आमचे आंदोलन थंड कदाचित पडले असते', तेथला एक डॉक्टर प्रतिनिधी बडोद्यास आला होता. तो सांगत होता; 'पण सरकार खोटे बोलते, त्याची सर्वांना फार चीड आली आहे. एकाच मेकचे, एकाच आकाराचे परशू (धारिये) हजारोंच्या संख्येने हरिजनांपाशी आले आहेत अशी गावात अफवा उठली आहे. तिच्याशी मकवानाचा संबंध जोडला जातो.'

'त्याला काही पाया?'

'त्यानंतर सवर्णांवर अत्याचार सुरू झाले. दवाखान्यात रोग्यांबरोबर डॉक्टरला मारून घायाळ केले. डॉक्टर मेला! न्यू क्लॉथ मार्केटपाशी वस्तऱ्याने एकावर हल्ला केला. तोही दुपारी एक वाजता. सायकली व स्कूटर्स लुबाडून घेऊन त्यांच्या मालकावर परशूचे घाव घातले गेले. एम. एम. खबातवाला हॉल म्हणजे प्रसिद्ध लग्नाचा हॉल. हरिजनांनी सवर्णांच्या स्त्रियांवर तेथे सामूहिक बलात्कार केले. तेथे कलकत्त्याच्या रवींद्र सरोवराची पुनरावृत्ती झाली! गांधीनगरच्या विधानसभेत त्यावर गरम गरम चर्चा झाली, तर गृहमंत्री म्हणतात कसे, त्या दिवशी त्या हॉलमध्ये लग्नच नव्हते! लगेच कोणी तरी त्या दिवशीच्या लग्नाची पत्रिकाच गृहमंत्र्याच्या हातावर ठेवली आणि तिचा फोटो दुसऱ्या दिवशीच्या पेपरात छापला. या सर्वांचा राग नाही येणार? म्हणून आम्ही चिडलो आहोत. भले, वर्ष फुकट गेले तरी पर्वा नाही. आम्ही हे आंदोलन चालूच ठेवणार!'

'पण बाकीच्या लोकांचा तुम्हास पाठिंबा आहे?'

'हे क्लास वॉर सुरू झाल्यामुळे कमालीचा पाठिंबा मिळतो आहे. पैसे गोळा होत आहेत. व्यापारी महामंडळ पुरे पाच दिवस बंद. नंतर गुमास्ता लोकांनी हरताळ पुकारला.'

'म्हणजे व्यापार बंद, औद्योगिक उत्पादन बंद.'

'बंद तर बंद! या सरकारला चांगला धडा शिकविला पाहिजे. साले काय समजतात? कर कोण देतो? एक तरी बी. सी. कर भरतो काय? हे सरकार चालते ते या सवर्णांच्या पैशावर. वेळ आली तर कर देणार नाही सरकारला! टेलिफोनची बिले, इन्कमटॅक्स, इलेक्ट्रिकची बिले, घराचे कर, पाणीपट्टी, रोडटॅक्स, वाहनकर–सारे बंद! बघूच या कसे सरकार चालविता तुम्ही! आप नाक मुठीत धरून याल व कराल आमच्या मागण्या मान्य! समजता काय? गुणवत्ता मान्य झाली नाही तर औद्योगिक उत्पादन पुरेसे होणार कोठून? सर्वत्र डोक्याचा प्रश्न आहे. तसे असेल तर करा जगजीवनरामांना पंतप्रधान! नेमू दे त्यांना सर्वत्र हरिजन अधिकारी. एक दिवस राज्य करता येणार नाही!'

'भ्रम आहे तुमचा.'

'भ्रम?' हा तरुण डॉक्टर तापला होता, 'अर्थकारण कशाशी खातात हे समजते का या जगजीवनरामांना किंवा त्यांच्या हरिजनांना? स्वत:ने दहा वर्षे इन्कम टॅक्स भरला नाही. त्याचेच उदाहरण गिरविणार त्याची अनुयायी मंडळी. मरतील! जिवंत राहणार नाहीत. स्वत: मरतील व सवर्णांनादेखील मारतील. ख्रिस्त्यांचे राज्य होईल कदाचित. मुसलमानांचे होईल; पण या हरिजनांचे नाहीच नाही!'

'पण आपल्याच बधूंच्या विरुद्ध ही भाषा शोभते का?'

'आम्ही हरिजनांविरुद्ध बोलत नाही. लुक, इट इज अबाउट द वे दे आर डुइंग धिस नॉनसेन्स, वुई ऑबजेक्ट टु इट. कोण म्हणतोय हरिजनांचा उद्धार करू नका म्हणून? आम्ही का त्यांना अस्पृश्य समजतो? आम्ही त्यांना दवापाणी नाकारतो का? या देशात गुणांना प्राधान्य का गुण नसलेल्या पण विशिष्ट जातीत जन्मलेल्यांना प्राधान्य? लढा यावर लढविला जात आहे. लक्षात असू द्या आम्ही हरिजनांना तुच्छ वा गौण समजत नाही, आम्ही सारे हरिजन व्हायला तयार आहोत, आहे सरकार तयार?'

## चार मार्च

आता हरिजनवस्त्यांतून पोलीस व आर्मी काढून घ्यावी अशी दलित पँथर्सनी मागणी केली आहे. आता वातावरण निवळले आहे, सर्वत्र शांतता झाली आहे, असे ते म्हणतात.

याचा अर्थ, माझा अहमदाबादी डॉक्टर मित्र म्हणतो ते खरे असावे.

त्यांना कोणी तरी शस्त्रे व्यवस्थित पुरविली असली पाहिजेत.

शस्त्रांचे उगमस्थान कोणते असू शकेल?

व्यापारी महामंडळ हे अहमदाबाद व गुजरातचे हृदय. अहमदाबादेस जाऊन या महामंडळापैकी कोणास गाठले पाहिजे. तसेच XX या रिझर्व बँकेच्या अधिकाऱ्यांना भेटायला पाहिजे. त्यांना बरीच माहिती असणार या दंग्याच्या आर्थिक बाजूची.

गोळी कोणी झाडली ते महत्त्वाचे नाही, त्या गोळीचे पैसे कोणी दिले ते महत्त्वाचे आहे, असा गुप्तचरखात्याचा एक महत्त्वाचा नियम आहे आणि त्यात फार मोठे तथ्य आहे.

काय नशीबवान आहे मी!

भविष्यात कधी आत्मचरित्र लिहिले तर 'नॉट बाय अपॉइंटमेंट्स्' हे शीर्षक त्यास द्यायला पाहिजे.

मला एक व्हिजिटचे बोलावणे येते. रोगी 'बडा' अधिकारी असतो, तोही अहमदाबादेचा. मला खूप आनंद होतो. झटून मेहनत घेतो मी. त्याची डोकेदुखी छान कमी होते. तो खूष होतो. तो काय काम करतो हे मी त्यास हळूच विचारतो. गडी एकॉनॉमिक इंटलिजन्समध्ये काम करतो. रिझर्व बँकेशी निगडित.

याला म्हणावे, योगायोग!

हा प्रसंग फक्त कादंबरीत किंवा हिंदी पिक्चरमध्ये बसू शकेल.

XXसाहेब बरीच उपयोगी माहिती देतात.

हा पैसा एकतृतियांश डॉक्टर्स, विशेषतः स्पेशॅलिस्टाकडून येतो, एकतृतियांश व्यापारी व उद्योगपतीकडून आणि एकतृतियांश देव जाणे; पण बहुधा कोणी राजकीय पक्ष देत असावा. निश्चित सांगणे अवघड आहे.

पुरावा असल्याशिवाय काय निश्चित सांगणार ?

जाहिराती येतात मोठमोठ्या. दहा-दहा हजार रुपयांच्या संदेश, गुजराथ समाचार व लोकसत्ता-जनसत्तामधून. त्याचे बिल उद्योगपतीकडून घेतले जाते परस्पर. त्याचे मरण आहे, सरकारतर्फेदेखील मोठमोठ्या जाहिराती पेपरातून प्रसिद्ध होतात. त्याचेही बिल हेच उद्योगपती भरतात ! म्हणजे संपूर्णपणे तटस्थ म्हटले तर आंदोलनाचे कैवारी, म्हटले तर सरकारास पाठिंबा देणारे. सरकार त्यांना थोड्या-फार सवलती देते. वस्तूचा भाव वाढवून मिळतो. एक लाख जाहिरातीसाठी खर्च केला तर दहा लाख कमावण्यास संधीही मिळते

व्यापाऱ्याचे मुख्य ध्येय नफा !

तो मिळतो.

आणि बँकांची पोझिशन ?

फार वाईट आहे.

आंदोलनाचे निमित्त.

एरवी कोणी काम करीत नाही.

ओव्हरटाइम खायला सवकलेली ही पांढऱ्या कॉलरची माणसे !

आता तर आंदोलनामुळे घराबाहेर पडायची भीती वाटते. म्हणजे बँका ओस! पुष्कळ बी. सी. आजकाल प्रत्येक बँकेतून चिक्कार भरलेले. थोडीशी सूडभावना, थोडीशी मिसचीफ व थोडीशी गंमत. सवर्ण आम्हाला एकट्याला गाठून मारतील ही सबब सांगून ऑफिस खोलायलाही कोणी येत नाही व कर्फ्यू 'पहायला' म्हणून गावभर हिंडतात ! काय बोलणार ?

रिझर्व बँक म्हणजे सर्व टॉप माणसे, सारे सवर्ण. आकड्यांचे तज्ज्ञ.

क्लिअरिंग हौस मात्र तकलिफीत आले आहे, पहिल्यांदा काही दिवस अधिकाऱ्यांनी लोकांना त्रास व्हावयास नको म्हणून खूप मेहनत घेऊन सारे चेकस क्लिअर केले. पहिल्याच दिवशी १७ बँकांनी सहकार्य दिले; पण २७ बँकांचे प्रतिनिधी गैरहजर होते. तरी क्लिअरिंग चालूच ठेवले; पण परिस्थिती हळूहळू बिघडत गेली आणि क्लिअरिंग ठप् बंद झाले !

काही टॉप नेत्यांनी रिझर्व्ह बँकेतील लोकांना खास टीप दिली, 'सांभाळा, फार शहाणपणा करू नका !'

ते जे समजायचे ते समजले.

'राजकारणात आपल्या पोटावर पाय यायला नको, आपण तर काय हुकुमाचे ताबेदार–' कुरकुरत ते म्हणाले.

२८ फेब्रुवारी रोजी क्लिअरिंग हाउसमध्ये ४४ बँकांचे प्रतिनिधी हजर झाले, २५० कोटी रुपयांच्या चेक्सचे क्लिअरिंग त्या दिवशी झाले. १२५ ट्रंका भरून त्या दिवशी रिझर्व्ह बँकेत चेक्स् आणण्यात आले.

विश्वासाचे वातावरण पुन्हा निर्माण झाले. मिलसदेखील पुन्हा चालू लागल्या.

व्यापार–उद्योग सारे मुरळीत सुरू झाले

## पाच मार्च

किरीट वसावड्यास मी फोन करतो. टाइम्स ऑफ इंडियात आज त्याचे पत्र प्रसिद्ध झालेले असते.

किरीट वसावडा बरोडा मेडिकल युनियनचा गेल्या वर्षीचा सेक्रेटरी. या वर्षीचा व्हाइस प्रेसिडेंट. पुढच्या वर्षी कदाचित् प्रेसिडेंट !

किरीटभाईचे पत्र चांगले विधायक असते. त्यातील दोन-चार मुद्दे चांगले असतात.

विशेषत डॉक्टरलोकांनी संपावर जावे, का जाऊ नये ?

नवीन पिढी औद्योगिक संस्कृतीची प्रतिनिधी आहे. संपावर जायला काय हरकत आहे, कामगार संपावर नाही जात ? मास्तर नाही जात ? आपण आणखी जास्त कोण आहोत ? वेज-अर्नर्स !

किरीट मला एक-दोन वर्षे ज्युनिअर. डॉक्टरांनी त्याग केला पाहिजे या प्रचारावर आमची पिढी सतत पोसली गेली आहे. 'खेड्यात जा !' 'फुकट काम करा !' 'सेवा करा !' वगैरे आदर्शवादाचे घडे आम्ही पचविले आहेत. व्यवसायी आहोत आपण, धंदेदार नाही. हे सतत कानांवर बिंबवले गेले आहे आपल्या.

हे संप वगैरे आपल्याला नाही पटत, रोग्यांची सेवा करणे हे काम नाही, हा आपला धर्म आहे आणि धर्मपालन नाही करायचे तर मग काय करायचे ? त्यासाठी तर लोकांनी जीव दिले आपले !

मला अरुण फाटक आठवला.

चिडून विचारीत होता, डॉक्टरांनीच काय म्हणून त्याग करायचा ? इंजिनिअर त्याग करतो ? जातो खेड्यात ? आर्किटेक्ट करतो त्याग ? जातो खेड्यात ? मास्तर ? मेकॅनिक ? त्यांनी गरिबांची सेवा का करू नये ? आम्ही काय त्यागाचा मक्ता घेतला आहे होय ?

मग ते राजकारणी ? आजन्म या खासदारांना पेन्शन कशासाठी ? करा ना त्याग ! करा ना सेवा !

त्याचेही मुद्दे पटतात.

पण आदतसे मजबूर है.

डॉक्टर आणि संप. मनास पटत नाही.

किरीट वसावड्याने तेच लिहिले होते चिडून चिडून ! रोग्यास शिक्षा करण्याचा काय अधिकार आहे डॉक्टरांना ?

काम चालू ठेवून नाही संप करता येत ? जपानमध्ये करतातच ना ?

अमीन किरीटभाईस सांगत होता, हिंदुस्थानात तसे होऊ शकत नाही.

पण का ?

कारण आमच्या पुढाऱ्यांची चामडी जाड आहे. साध्या गोष्टी त्यांना स्पर्शतच नाहीत. खिजगणतीत नसतात. जाळपोळ व विध्वंस केला तर लोक भडकतात व जनक्षोभ टाळण्यासाठी त्यांना जागे व्हावे लागते. एरवी त्यांनी काही केले नसते. करत नाहीतच. त्यांचा दोन मुद्द्यांचा कार्यक्रम राबविण्याची त्यांनी प्रतिज्ञा घेतलेली असते. सत्ता व पैसा ! तोही फक्त स्वत साठी. नेपोलियनच्या डिक्शनरीत अशक्य शब्द नव्हता. यांच्या डिक्शनरीत जनता हा शब्द नसतो.

जनतेचे हित अधूनमधून होते ते याच्याशिवाय, यांच्या नकळत. चुकून होऊन जाते.

व्यास, किरीट वसावडा किंवा मी, आम्ही जुन्या पिढीतील डॉक्टर्स. या नव्या पिढीशी आमचे जमत नाही. जनरेशन गॅप. व्याससारखा 'सोशल कॉन्शसनेस'वर भर देतो. सोसायटी तुमच्यासाठी एवढे करते; ते ऋण तुम्ही परत फेडायला नको ?

नव्या पिढीला ते पटत नाही.

कसले सामाजिक ऋण ?

समाज थोडेच आम्हास डॉक्टर्स बनवितो ? आम्ही मरमर मरतो. अभ्यास करतो. ८० टक्क्यावर मार्कस् मिळवितो. तेव्हा कुठे आम्हाला डॉक्टर बनण्यासाठी प्रवेश मिळतो !

आम्ही थोडेच बी सी. आहोत ?

चाळीस टक्क्याना प्रवेश.

पुस्तके फुकट. नापास होणार नाही याची गॅरंटी. म्हणजे अभ्यास न करता डॉक्टर्स व्हायची हमी !

जर सामाजिक ऋण कोणी फेडायचे असेल तर या बी. सी. डॉक्टर्सनी.

पण हे काय करतात ?

हळूच 'रॉय' होतात, 'व्यास' होतात, 'पटेल होतात. कारण सोशल रेकग्निशन् मिळते ना ? म्हणून नामांतर !

स्वतःच्या जातभाईंना जोडयाशीदेखील उभे ठेवीत नाहीत. फटकून वागतात. आपण कोणी तरी स्वर्गातून पडलो आहोत असे दाखवितात. सुपर-ब्राह्मणांप्रमाणे

त्याना सागा तुमची सामाजिक जागृतीची व ऋणाची भाषा.

आम्हाला नका सांगू ते उच्च तत्त्वज्ञान ! आम्ही 'वेज-अर्नर्स' आहोत.

रोज कमवणार व रोज खाणार !

¤

आज या ज्युनिअर डॉक्टरानी व विद्यार्थ्यांनी रॅली काढण्याचे ठरविले होते. पोलो पॅव्हिलियन ते एस. एस. जी. हॉस्पिटल.

डी. एस्. पी. मेहतानी त्याना नकार दिला. परवानगी दिली नाही.

तरीही त्यानी मोर्चा काढला !

आणि मेहेताच्या पोलिसानी लाठयांचे तडाखे मारले.

एक अकरा वर्षांचा मुलगा त्यात खूप घायाळ झाला. दुसराही लहान मुलगा असाच जखमी झाला.

त्या दोघाना हॉस्पिटलमध्ये दाखल केले आहे.

मोर्चा अर्थातच निघाला नाही.

ही मुले चिडून आम्हाला सागत होती, त्याना या मुलाना मारायचा काय अधिकार आहे ? केवढी कोवळी मुले ?'

माझे मन आतून हसत होते. त्याला गुदगुल्या होत होत्या.

'लेको, तुम्ही कामगार ना ?

वेज अर्नर्स ना ?

मग काठया खायला का घाबरता ? तुमची डोकी फुटली तर एवढे डरायला काय झाले ?'

पण हे बाहेर बोलून दाखविणे योग्य ठरणार नव्हते.

शात रहा, चूप रहा. मौन कित्येक वेळा जास्त उपयोगी असते.

¤

किरीट वसावडयास मी फोन लावतो. 'अरे बाबा, तू बक्षी पचवाल्यांना कोठे आत खेचले आहेस ?'

बक्शी पंच म्हणजे आर्थिकदृष्टया मागासलेले. त्यासाठी पंचाहत्तर जाती सरकारने ठरवून दिल्या आहेत. या एस. सो. एस. टी.च्या बाहेरच्या आहेत. गुजराथमध्ये त्याच्यापैकी पाव मुसलमान आहेत. वसावडा जनसंघी नाही. मग त्याचा विरोध कसा ? टाइम्सला लिहिलेल्या पत्रात त्याने या आर्थिकदृष्टया मागासलेल्यांना विरोध का व कसा केला आहे ?

किरीट वसावडा म्हणतो, 'कारण यात पुष्कळ भ्रष्टाचार चालतो. खेडेगावात जाऊन चारशेपाचशे रुपयांना हे जातीचे सर्टिफिकेट मिळते. पचायतीचे नाव आधीच चागले नाही आणि त्यात ही भर. भ्रष्टाचार वाढेल. मी माझ्या पत्रात लिहिले आहे. वाचा तुम्ही. आणखी दोन वर्षांनी ह्यावरून पुन्हा आदोलन होईल. तेव्हा वेळीच सावध होऊन ह्या रोगास थांबवा, नाही तर रोग वाढेल ! सर्जरी करायची जरूर पडेल भविष्यात. कशाला ती वेळ आणायची आपण आपल्या हातानी ?

¤

माझा मेडिकलला असलेला मुलगा मला सागतो, 'गोव्याच्या मेडिकलच्या विद्यार्थ्यांनी आम्हाला पाठिंबा दिला आहे.'

'त्याने काय होणार ?'

'ही आग आम्ही साऱ्या भारतभर पसविणार. विजय आमचा आहे !'

'आहे कोठे आग ? फक्त राख उरली आहे !'

---

## सहा मार्च

---

वैजयंती दवाखान्यात घाईघाईने आली. हातात तार होती.

रोग्याची खूप गर्दी.

हातातील तार हालवत वैजयंती म्हणते, 'इदिरा गाधीची तार !'

एक मन म्हणाले, शक्यच नाही !

दुसरे मन म्हणाले, का शक्य नाही ? आपण इंदिरा गाधीना पत्र लिहिले होते आसाम व गुजरायची तुलना केली होती. दोन्ही तेल व पेट्रोल देणारी सपन्न राज्ये. दोघाकडे गरम माथ्याचे विद्यार्थी. तसेच उद्धट, मूर्ख व पिसाट पोलीस. ते कमी पडतात म्हणून आर्मीचे लोक. आसामचे तर आदोलन किती दिवस चालू आहे ? आता गुजरायचे मुलाचे नुकसान आहेच आहे, पण औद्योगिक नुकसान किती भयंकर आहे ? गुजरायचे वैभव म्हणजे औद्योगिक उत्पादन. दत्ता सामंतमुळे साऱ्या इडस्ट्रीज गुजरायमध्ये येत आहेत आणि जर ह्या इथे चालणार नसतील तर ?

गृहमंत्री मकवाना अहमदाबादेस येऊन चक्क चिथावणी देतात हरिजनाना. दलित पॅंथर्सजवळ एवढी शस्त्रास्त्रे येतात ती कोठून ? पोलिसावर पठ्ठे गोळीबार करतात !

हे पटणारे नाही.

माधवसिंग सोळंकी व मकवाना यांच्यातील हे युद्ध थांबवा. सवर्ण व हरिजन याच्यातले हे युद्ध हे दोघेजण पेटवीत आहेत.

गुजराथमध्ये सध्या ही नवीन आग चालू आहे. गांधीजींच्या गुजराथमध्ये ही आग योग्य नव्हे. हे वर्णयुद्ध किंवा जातीचे युद्ध म्हणा; पण गुजराथच्या शांततेस घातुक आहे.

काय करावे ?

दुसरा उपाय दिसत नाही.

गांधीनगरच्या पातळीवरील सर्व उपाय हरले. इंदिरा गांधी हा एकमेव उपाय शिल्लक आहे.

इंदिरा गांधींनी आता मध्ये पडून विद्यार्थ्यांना चुचकारून हे युद्ध थांबवावे. गुजराथची शांतता पुनश्च गुजराथला परत द्यावी.

त्यासाठी आमच्याजवळ एक फॉर्म्युला आहे. रिझर्व्हेशन काढायला नको. विद्यार्थीही खूष होतील असा फॉर्म्युला.

तुम्ही परवानगी देत असाल तर आम्ही विद्यार्थ्यांना घेऊन येतो. आपण चर्चा करू. हा प्रश्न सहज निकालात काढू.

माझी विचारांची साखळी तुटली.

वैजयंतीच्या हाती तार होती. चेहेऱ्यावर हास्य होते.

दिल्लीस गेलो तर मिलिंदला घेऊन जायचा विचार होता. मेडिकल स्टुडंट होता आणि फोटोग्राफर. उत्कृष्ट फोटोग्राफर !

डॉ. व्यास, हे विद्यार्थी व मी.

आणखी एक-दोन डॉक्टर्स.

इंदिरा गांधींना भेटायला जायचे म्हणजे मारामारीच होणार !

प्रत्येकजण म्हणणार, मी मोठा, मी दिल्लीला येणार !

सारे डॉक्टर्स सांपत्तिक दृष्टीने व्यवस्थित आहेत. दिल्लीचा जायचा-यायचा असा किती खर्च आहे ? आणि दिल्लीत राहायला आय. एम, ए.चे हॉस्टेल आहेच.

मागे आपण उतरलो होतोच.

जत्तीकडे आपल्यास 'अॅट होम' दिला होता. नंतर दीड तास आपल्या गप्पा झाल्या. आणीबाणीच्या गप्पागोष्टी.

आणि या खेपेस इंदिरा गांधींबरोबर चर्चा. या वेळेस फोटो पाहिजेतच !

मागे दिल्लीत आपण दोनदा इंदिरा गांधींना भेटलो. दोन दोन तास चर्चा केल्या; पण फोटो नाही घेतला !

रंगपूरला आपण त्यांच्याबरोबर होतो. एकत्र जेवलोदेखील; पण ते फोटो अजून पहायला नाही मिळाले !

मी वैजयंतीकडे बघतो.

सुहास्य वदनाने ती माझ्याकडे बघत असते. साहजिकच आहे, आपला पती मुलांना घेऊन इंदिरा गांधींकडे चर्चा करायला जाणार. नवऱ्याचे कौतुक तर बायकोला असणारच !

मी आनंदाने म्हणतो, 'अग, तार तर पाहू दे !'

सस्मित वदनाने ती माझ्या हातात तार ठेवते.

घाईघाईने मी तार वाचतो व तार टेबलावर फेकून देतो.

क्रुद्ध डोळ्यांनी वैजयंतीकडे पाहू लागतो. रोग्यांना ही गरमागरमी कळेना. वैजयंतीचे हसणे चालूच होते.

मी बाबूला फर्मावतो, 'चल बाबा, पेशंटस्ना बोलाव एकेकाला. खूप गर्दी दिसते आहे बाहेर.'

बाबू माझ्या गरम चेहेऱ्याकडे व हसणाऱ्या बाईसाहेबांकडे पुन्हा एकदा बघतो. मी त्याच्यावर डाफरतो, 'हं, लौकर पेशंटस्ना बोलाव !'

'बोलावतो साहेब !' केविलवाण्या व असहाय्य मुद्रेने बाबू मला सांगतो.

पण त्याचा चेहरा गोंधळलेला वाटतोय.

साहजिक आहे.

पण मी त्याला कसे सांगू, ही तार इंदिरा गांधींची नाही, ही तार आहे पुण्याच्या माजगावकरांची. लेखाचा उरलेला भाग ताबडतोब धाडून द्या म्हणून त्यांची तार असते.

पेशंटस्ची गर्दी संपवून मी घरी येतो.

मन स्वतःचा बचाव करीत असते, बरी इंदिरा गांधींची तार नाही आली. सीझन फुल्ल आहे. एवढे रोगी सोडून जायचे कसे ? या पुढाऱ्यांना काही कल्पना असते, आपण किती नुकसान सोसून त्यांना भेटायला जातो ? मस्त एअरकंडिशंड खोल्यात बसतात. इथे किती काम आहे. चला, वेळ, शक्ती व पैसे, सर्वांची बचत झाली. काम करा काम !

दुसरे मन म्हणते, पण इंदिरा गांधींनी मला बोलवायला पाहिजे होते. केवढा वट् वाढेल ! गुजराथमध्ये शांतता निर्माण करण्याचे क्रेडिट पदरी पडेल. मजा येईल जर दिल्लीचे आमंत्रण आले तर !

लगेच पहिले मन डाफरते, लेका, तू विरोधी पक्षाचा. क्रेडिट द्यायचे तर इंदिराच्या पक्षातील लोकांना नाही देणार ? तुला कशाला ?

मनात विचार येतो एवढी इंदिरा गांधींना भेटायची आतुरता का ?

काहीही म्हणा, इंदिरा गांधींना भेटायची मजा तर येतेच. आपण एवढ्या लोकांना भेटलो आहोत; पण लक्षात राहतील अशा तीनच भेटी. पं. नेहरू, राधाकृष्णन् व इंदिरा गांधी ! तिघांजवळ काही तरी तेजस्, स्पिरिच्युअल पॉवर होती. त्यांच्या मानाने इतर मुळाभाजी ! ती भेटायची मजा, थ्रिल कोणाही जवळ नाही !

आणि मी इतरही विरोधी पक्षाचे म्होरके पाहिलेले आहेत. त्याच आनंदात, त्याच बेहोषीत सांगत असतात, मी जेव्हा इंदिरा गांधींना भेटलो होतो तेव्हा त्या म्हणाल्या—

आपण का म्हणून अपवाद रहावे ?

घरी वैजयंती चिडवते, 'अहो, पुढारी, आता इंदिरा गांधींच्या विचारातून बाहेर या म्हटलं !'

मी थोडासा वरमतो.

जेवायला बसतो, तिच्याशी गप्पा मारू लागतो; पण तिलाच जाणवते, मन अनझ्झी आहे. मनातील 'इंदिरा' अजून जात नाही ! ◻

डॉ. व्यासचा फोन येतो.

तो जामनगरला जाणार असतो.

मी त्याला विचारतो, 'एकदम जामनगर ?'

'हं, दयाळ कमिशन,' हसत त्याचे उत्तर येते, 'सरकारी गाडीने जामनगर !'

'मजा करके आव !'

'हं—'

माझ्या मनात येते, या आंदोलनाचा सर्वांत मोठा फायदा डॉ. व्यासला झाला आहे नाही तर दयाळ कशाला डॉ. व्यासला ओळखणार ?

पोस्ट ग्रॅज्युएट स्टडीज्साठी डॉ. व्यासची स्कीम चांगली उपयोगी होईल. आपल्या मुलांचे भले होईल.

दयाळचे आपल्याला आभाराचे पत्र आले होते, त्याची आठवण येते. नव्या स्कीमसाठी पाच फूटपट्ट्या मी सुचविल्या होत्या. त्यांचा ते विचार करणार होते.

दयाळ ठीक आहे, सेक्रेटरी.

मनात येते, पण इंदिरेचे आमंत्रण यायला पाहिजे होते. गुजराथच्या भल्यासाठी !

## आठ मार्च

आता सरळ सरळ वृत्तपत्रांनी हे आंदोलन तोडण्यासाठी प्रचाराची कोशीश चालविली आहे. पहिल्या पानावर आता सर्व वृत्तपत्रातून एकच मथळा व एकच चौकट दिसते, 'गुजारातनु आंदोलन भंगाणना आरे उभु छे.' म्हणजे हा किल्ला लौकरच पडणार, गडगडणार!

सरकारचा फार्म्युला डॉक्टरमंडळी आता स्वीकारणार असे त्यांच्या गुप्त बैठकीतून बाहेर आलेल्या बातम्यांवरून कळते. इंडियन मेडिकल कौन्सिल विद्यार्थ्यांवर आता रोज जास्त जास्त दाब आणून हे आंदोलन स्थगित करण्यासाठी आग्रह धरीत आहे असे ही वृत्तपत्रे सुचवीत आहेत. आंदोलन समितीचे कन्वीनर राजेश व्ही. पोडा याचेही असेच मत असल्याचे पेपर्स देत आहेत. गल्लीबोळात धमाल करण्याची लोकांची आता तयारी नाही, ज्युनिअर डॉक्टरामध्ये तीव्र मतभेद व तट पडले आहेत. राखीव जागाविषयी काही बोलायचे नाही, असा गृहमंत्री झैलसिंग यांनी स्टॅंड घेतला असल्यामुळे वैद्यकीय विद्यार्थ्यांनी काय करावे ते कळेनासे झाले आहे.

टीव्हीचा प्रचार अत्यंत सोज्ज्वळ व प्रभावी आहे. अहमदाबाद टीव्हीवाल्यांचा जो कोणी प्रमुख असेल त्याच्या प्रचारकौशल्यास आपले सलाम. टीव्हीवरचा माधवसिंग सोळंकीचा जो कोणी कार्यक्रम पाहील व ऐकेल त्यास निश्चित् वाटेल, हा मुख्यमंत्री किती साधाभोळा व सरळ आहे ! विद्यार्थ्यांच्या मागण्यात व आम्ही जे देऊ केले आहे त्यांत फारसा फरक आता राहिलेला नाही हे त्याचे मुख्य स्लोगन. दलिताची आम्हाला काळजी हे दुसरे स्लोगन. विद्यार्थ्यांशी आमची दुष्मनी थोडीच आहे, ती आमची मुले आहेत, हे तिसरे स्लोगन. माधवसिंग सोळंकी असे गोड गोड बोलतात की सामान्य माणसाला हा एवढा विद्यार्थ्यांना द्यायला निघाला आहे तरी हे वेडे विद्यार्थी हिंसाचार करीत सुटले आहेत असाच ग्रह व्हावा. वस्तुत. हे सारे मायाजाळ आहे, नाटक आहे, फसवे आहे. तीन दिवसापूर्वी बडोद्याहून विद्यार्थी गांधीनगरला माधवसिंग सोळंकींनी बोलावले म्हणून गेले तर हा प्राणी जागेवर हजर देखील नव्हता ! चर्चेची गोष्ट दूरच राहिली

प्रचारात विषारी प्रचार हरिहर खंबोळजा याचा. त्याची दोन वाक्येच मी उद्धृत करतो : 'राष्ट्रीय स्वयसेवक सघ अने भारतीय जनता पार्टीना रूढीचुस्त अने फासीवादी तत्त्वो (आत्यंतिक) आदोलनमां सीधा संकळाएला (संलग्न) छे. आ तत्त्वो भाजपना प्रमुख श्री. ए. बी. बाजपयजीना अंकुश बहार छे.'

याचा अर्थ उघड आहे. वाजपयजी व आर. एस. एस. वाल्याना अलग पाडले की आपोआप इंदिरा कॉंग्रेसचे काम होऊन जाईल व सघाची मंडळी डीमॉरलाइज् होतील, असे या मंडळीचे गणित आहे.

इंदिरा कॉंग्रेसचे हे चित्र एका बाजूला आणि अहमदाबादेच्या आदोलनसमितीच्या तरुण मडळीचे चित्र दुसऱ्या बाजूला. त्यांची महत्त्वाकांक्षा मोठी आहे. त्यांना हे आदोलन जास्त उग्र करण्याची इच्छा आहे. त्यासाठी त्याची समिती शिक्षण, रोजगार व बढती या सर्व क्षेत्रांतील राखीव जागाचे प्रस्थ काढून टाकण्याच्या मागे आहे. सर्व सरकारी व मिल्स् किंवा पब्लिक सेक्टरमधील कर्मचाऱ्याचा पाठिंबा या मुलानी मिळवला तर इंदिरा कॉंग्रेसला गुजराथमध्ये राज्य करणे मुष्कील होऊन जाईल अशी यांची धारणा आहे. राजकीय विरोधी पक्ष याबाबतीत त्याना सहकार्य देतील–निदान गुप्तपणे-असे या तरुण मंडळीना वाटते. अहमदाबादेचे निखिलेश व बडोद्याचे नीलेश शुक्ल याची तशी खात्री आहे. कॉंगीच्या खासदारावर व आमदारावर दाव आणून त्याना राजीनामा देण्यास भाग पाडावे असा त्यांचा मनसुबा आहे.

लंका, इंडोनेशिया, फ्रान्स या देशातील विद्यार्थ्यांच्या चळवळीचा ताजा इतिहास बघितला तर हे अशक्य नाही असे वाटते. ही पोरे अजब आहेत. जास्तीत जास्त काय होईल, एक वर्ष बिघडेल, काही हरकत नाही. आमचे वर्ष बिघडविणाऱ्या राजकीय नेत्यांची जिंदगी आम्ही पार धुळीस मिळवू अशी त्याची जिद्द आहे.

राजकारणी नेते म्हणतात, ही फार आशावादी महत्त्वाकाक्षा झाली. आम्ही अशी कैक आंदोलने पचविली आहेत. राजकारणी म्हणजे मुरब्बी लोक ! या पोराना आपण सहज खेळवू ! हां हां म्हणता त्याच्यात फूट पाडू. हे बुद्धिवादी लोक, जरा संधी मिळाली की भाडतील व एकमेकाचा काटा काढतील. प्रत्येक जण शहाणा. करतील मारामाऱ्या एकमेकात !

प्रेसवर सेन्सॉरशिप टाकू. दंग्याची बातमीच आली नाही तर कंटाळतील व करतील आंदोलन बंद एके दिवशी !

पेपरमध्ये नाव नाही.

म्हणजे हिरोगिरी नाही.

रेकगनिशन नाही.

म्हणजे आमच्याशी लढण्याऐवजी हे हिरो एकमेकात लढतील व व एकमेकाना खलास करतील !

प्रेस सेन्सॉरशिपमुळे हे हिरो गेले, बुडाले, साफ गाडले गेले तेही लोकाना कळणार नाही.

मुले म्हणतात, 'डोट अडरएस्टिमेट अस. इंदिरा गाधीना जिथे आम्ही खाली आणले तिथे माधवसिंग, सोळंकी क्या बडी बात है ? होऊनच जाऊ द्या ! पहाच आमची ताकद. प्रेस सेन्सॉर कराच आम्ही अंडरग्राउंड पत्रके छापू व वाटू !'

¤

कमलाशकर पड्या म्हणजे बडोद्याच्या सर्व चळवळीचे आद्यस्थान. लोहियानंतर 'डॅमसेल इन डिस्ट्रेस'ला मदत करणारे उत्साही

वृद्ध म्हणजे कमलाशंकर. राजकारणाचे भेदक व वास्तववादी ॲनॅलिसिस करण्यात त्यांचा हातखंडा आहे. दोन्ही बाजू आमने-सामने ठेवून समतोलपणे त्याचे वजन जोखून, जास्त भारी पारडे कोणते हे सागणे हे त्यांचे खास केळकरी वैशिष्टच ! त्याना या आदोलनाविषयी विचारले तर त्यांनी त्याचे दोन्ही मुद्दे कागदावर माडून दाखविले.

१. हे आदोलन गुजराथच्या १९ पैकी १८ जिल्ह्यात पसरले आहे, ही वस्तुस्थिती गृहराज्यमंत्री योगेंद्र मकवाना यानी स्वीकारली आहे.

२. याची गोल्डन ज्युबिली (पन्नास दिवस) साजरी झाली.

३. ग्रामीण भागात राखीव जागाची विरोधी भावना पसरली असून रोज तेथे नित्यनव्या वावडया उठतात.

४. शाळा-कॉलेजे बंद आहेत. परीक्षा देखील रद्द होतील.

५. देशातील इतर राज्यांत याचे प्रतिध्वनी उठले आहेत. चंडीगढ येथे अडीच हजार डॉक्टरानी रॅली काढली. राजस्थानात जोधपूर व शिरोडी येथे सहानुभूती दाखविण्यासाठी शहरे बंद ठेवण्यात आली होती. डुगरपूर बंद होते. मुबईत सहानुभूती आहे व शिवसेनेच्या बाळ ठाकऱ्यांनी डॉक्टराना पाठिंबा दिला आहे.

६. ही लागण सरकारी, अर्धसरकारी, सहकारी व शैक्षणिक तसेच बँकेच्या कर्मचाऱ्यापर्यंत पोचली आहे.

७. इंदिरा गांधीनी सावधपणे विधान केले आहे, गुणाची उपेक्षा होणार नाही असे बघितले पाहिजे.

८. हळूहळू गुजराथबाहेर असे आदोलन सुरू व्हायची अस्पष्ट चिन्हे दिसत आहेत.

याच्या उलट दुसरी बाजू तेवढीच महत्त्वाची आहे.

१. इश्यू मर्यादित आहे.

२. 'व्होट बँके'स धक्का लागेल असे कोणताच राजकीय नेता काही करणार नाही.

३. लोक आता शाळा बद, कॉलेज बंद, व्यापार बंद, रोजी-रोटी बंद या प्रकारास कंटाळले आहेत.

४. सरकारजवळ आर्मी आहे. जाहिराती देण्यासाठी वाटेल तेवढा पैसा आहे. तुमचे काय होते आहे याची चिंता सरकारला जराही नाही.

५. माधवसिंग सोलंकी जावेत असे दिल्लीपती मकवाना व गांधी-नगरमधील सनत मेहेता यांना वाटते. म्हणजे मग मकवाना, सनतभाई व झीणाभाई दर्जी याचे गुजराथवर राज्य सुरू होईल. तो गुजराथ-साठी काळा दिवस ठरेल ! या मंडळीना राज्य करणे जमणार नाही. माधवसिंग सोलंकी जास्त सोफ्बर व मॅच्युअर आहेत.

दोन्ही बाजूंची पाहणी केल्यास कमलाशंकर पंड्यांना असे वाटते की, हे आदोलन आता पधरवडयात नैसर्गिक मरण पावेल. कदाचित जास्त काळ चालले तर माधवसिंग सोलंकीचा बळी घेईल !

कमलाशंकरदादा म्हणतात, 'जगजीवनरामाचे भाषण वाचले ? ते मुळी गुजराथ पेटवायलाच आले आहेत असे वाटते. एवढया मोठ्या पुढाऱ्याच्या तोंडी ही भाषा शोभत नाही. नासाखाली त्यानाच अटक केली पाहिजे !'

'कोणती भाषा ?'

'प्रत्येक अल्पसंख्याक जमातीने आपल्यासाठी प्रमाण ठरवून घेतले पाहिजे. मुसलमानात दाऊदी बोहरा आहेत त्याचे एवढे प्रमाण, सुलेमानी बोहराचे एवढे प्रमाण, पाश्यांचे एवढे प्रमाण, ख्रिस्त्याचे एवढे प्रमाण, काय हा पागलपणा ?'

'हं.'

'जगजीवनराम नरोडारोडवरील चामुडा चाळी व हरिजन हौसिंग कॉलनी पाहावयास गेले. त्याना एकात २५ व दुसऱ्यात १५ घरे रिकामी दिसली. मेघाणी नगरात ४१ झोपडया त्याना जाळून टाकलेल्या दिसल्या. सरसपूर येथील फुलचद चाळीतील शंभर हरिजन कुटुबे दुसरीकडे भिऊन निघून गेलेली त्यांनी पाहिली. हे आदोलन थेट गावापर्यंत पोचले आहे. ज्या राज्यात ४०० हरिजनांना आपली घरे सोडून निर्वासित बनावे लागते ते सरकार कार्यक्षम आहे असे मी कसे म्हणू ? असा सवाल त्यानी विचारला. तुमच्या मुख्यमंत्र्यांचा मला (बाबूजी) परवा फोन होता. विमानात ते माझ्याबरोबर होते. गृहमंत्रीदेखील होते. मला भेटायला हजारो हरिजन आले होते. एकानेही वैद्यकीय विद्यार्थ्यांनी हे तोफान केले अशी चुकूनदेखील तक्रार केली नाही. या तोफानामागे राजकीय पक्षांचा हात आहे असे जगजीवनराम म्हणाले.'

'एक पाहिले, पत्रकारांनी बाबुजीना विचारलें, 'तुम्हाला राष्ट्रीय नेत्याऐवजी लोकानी हरिजन-नेता बनवून टाकले आहे.'

'त्यानी त्यावर उत्तर दिले ना, 'मला भेटायला हरिजनाशिवाय दुसरे कोणीही आले नाही.' असे भडक बोलून गुजराथ पेटवायला जर कोणी आले तर त्यांना कोण भेटणार ? जगजीवनराम व मकवाना एक आहेत असे दिसते आहे'.

'जनसंघी नेते मकरंद देसाई यानी आज दिल्लीहून या आदोलना-मागे इंदिरा काँग्रेसचा हात आहे असे सरळ म्हटले आहे.'

'हे आरोप-प्रत्यारोप चालूच राहणार. आता हा राजकीय खेळ सुरू झाला आहे. कोणास देशाची, देशाच्या समृद्धीची, औद्योगिक विकासाची जराही चिंता नाही. जो तो माझी खुर्ची, माझा पक्ष, माझी जात व माझी मूठभर माणसे या चिंतेत गर्क आहे. देशाचे दुर्दैव आहे !' □

---


सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना
हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. —डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे
मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

श्यामचा संसार (कथा – ५ )

फिरोज़ रानडे

# श्यामला पण उबग आला त्याची कथा

'आपल्यालाही आता अगदी उबग आला आहे बुवा. पुढल्या वेळी आपण प्रेसिडेन्ट होत नाही.' श्याम रात्रीचे साडेअकरा-बाराच्या सुमारास नुसतेच लोटून घेतलेल दार उघडून घरात येत म्हणाला.

राधा दिवाणावर पडल्या पडल्या स्त्री-जीवनाच्या कोणत्या तरी अंगाला वाहिलेल्या मासिकाचा अंक वाचत होती. श्यामचे उबग-मय उद्गार ऐकताच तिने हातातले मासिक बाजूला केले व ती विचित्रपणे हसली.

राधाच्या हसण्याला 'विचित्र' असे जरी म्हटले असले तरी त्या विशेषणाने राधाच्या हसण्याचे सार्थ वर्णन होत नाही. तसे हसणे स्वतःच अनुभवावयाचे असते. 'असं नेहमीच म्हणता हां–तुमचे म्हणणे काही मनापासूनचं नसते–करून करून काय कराल हां?' असे सर्व विचाराचे रस-मिश्रण बायकांच्या अशा 'विचित्र' हसण्यातून बाहेर पडते. वर नवऱ्याची परिस्थिती कायमची emergency मधल्या मराठी लेखकासारखी–साधा राग-सुद्धा व्यक्त करता येत नाही बिचाऱ्यांना !

श्यामच्या तोंडून 'उबग आला आहे बुवा' हे वाक्य कोणत्या संदर्भात निघाले आहे हे न कळण्याइतकी काही राधा अडाणी नव्हती. ती नियमितपणे म. टा. वाचते व निदान एक तरी विनोदी-लेख असताच म्हणून र. चा म. टा. अगदी मनापासून वाचते. तेव्हा प्रथम राष्ट्रपतींना उबग आला, मग मराठी विनोदी लेखकांना उबग आला, तेव्हा आता आघाआधीन नोन-विनोदी लोकांनापण उबग येणार हे ती जाणून होती, पण अगदी रविवारी उबग-लेख वाचून लगेच सोमवारी श्यामला उबग येईल अशी मात्र तिला कल्पना नव्हती. त्यामुळे तिला एकदम हसू आले होते.

आता राधा हसू लागल्यावर श्यामला काय करावे ते सुचेना. पुढच्यास ठेच व मागला शहाणा, अशी मराठी म्हण आहे; पण त्यात 'मागला' शहाणा होत असतो. नवरा आपला 'पुढचा' ठेचा खाणारा असतो. श्यामने काही गंभीरपणे सांगितले आहे व राधाने ते गंभीरपणे घेतले असे कधीही होत नसे. तरी परत परत तो राधाला सांगायचा व राधा 'विचित्र' हसायची. थोडक्यात *श्यामला परत एक ठेच लागली व राधा,* हसली होती.

राधा श्यामच्या उबग येण्याला विचित्र हसली हे अपेक्षितच होते; पण राष्ट्रपतींच्या उबग येण्यावर विनोदी-लेखरूपी हसणे व तेही पुरुषांनी करावे ना? खरं म्हणजे जगातल्या सगळ्या पतींना राष्ट्रपतींच्या उबग येण्याविषयी कणव यावयास पाहिजे. तसे म्हटले तर घर-पती व राष्ट्र-पती ह्यात काय जास्त फरक आहे? दोघेही एकाच जातीचे. त्यामुळे राष्ट्रपतींच्या भावना, त्यांची दु:खं, त्यांचे होणारे मानसिक हाल हे खरे म्हणजे घर-पतींनी समजावयास पाहिजेत व सहानुभूती दाखवावयास हवी.

राष्ट्रपती हा जसा नावाचा व लोक म्हणतात तसा रबरी शिक्का असतो, तर घर-पतीसुद्धा नावाचाच आणि वर शिक्कापण नसतो. राष्ट्रपतींच्या नावाने राष्ट्राचा सर्व राज्यकारभार चालत असला तरी पंतप्रधा-नच सर्व सत्ता आपल्या हाती ठेवून व गाजवून असतात. घराच्या राज्यातही दुसरे काय होते? रेशन-कार्डावर जरी त्याचे कुटुंब-प्रमुख म्हणून नाव असले, मुलांच्या प्रगति-पुस्तकावर जरी त्याचे पालक म्हणून नाव असले, घराच्या दारावर जरी घर-पतीच्या नावाचा बोर्ड असला तरी ते दार लोटून आत गेल्यावर खरा कुटुंब-प्रमुख कोण व खरा पालक कोण, हे ताबडतोब लक्षात येते.

एखाद वेळेस एखादा राष्ट्रपती स्वतंत्रपणे काही करू बघतो, अगदी नाही असे नाही. त्याचप्रमाणे घर-पती सुद्धा स्वत:च्या जबाब-दारीवर काही धाडस करतो. पण दोघांचेही ते धाडसच ठरते. आता आपल्या श्यामचेच बघा ना.

बरेच दिवसांपासून श्यामला दोन बनियन आणावयाचे होते. राधाला त्याने किती वेळा सांगितले, पण काही ना काही कारणाने ती पुढे ढकलत होती. तेव्हा श्यामने एक दिवस अगदी ठरवले की, काही झाले तरी आपले *आपण बनियन आणावयाचे व मग ते झोकात* राधासमोर टाकावयाचे. त्याप्रमाणे त्याने दोन बनियन आणले. अगदी चांगल्या प्रसिद्ध कंपनीचे आणि ज्यांची वर्तमानपत्रातून अगदी न लाजता जाहिरात होत असते तसे महागडे ते राधाला दाखवले.

राधाने ते गंभीरपणे पाहिले. राधाला माहीत होते की, बनियन आणण्यात तिच्या-कडून दिरंगाई झाली होती. त्यामुळे मला न विचारता बनियन का आणलेत, हे ह्या वेळी विचारणे आपल्या सोयीचे नाही हे ती जाणून होती. 'लंगडी बाजू' कोणाची हे बायकांना झटकन कळते; म्हणून राधा त्या मुद्द्यावर चूप राहिली. पण श्यामने आप-ल्याला न विचारता बनियन आणले हे मनो-मनी तिला आवडले नव्हते.

राधाने हातात बनियन घेतला व 'पोत' नावाची गोष्ट जी फक्त बायकांनाच कळते, ती बघू लागली व हलक्या आवाजात म्हणाली, 'कोणत्या का कंपनीचे असेनात हे बनियन काही दोन धुणी जाणार नाहीत. दोन धुण्यात त्यांची अगदी धिरडी होणार!' धिरडी होणार म्हणजे भोके–भोके पडणार ! राधा–शब्द–कोशातला शब्द !

आता देव पण बघा ना–चांगला पुरुषा-सारखा पुरुष असून नेहमी बायकांच्या बाजूचा असतो व म्हणून बायकांचेच म्हणणे खरं करतो !

झाले. राधाने म्हटल्याप्रमाणे त्या बनि-यनचे दोन धुण्यात अगदी धिरडे झाले. आता राधाला जोर चढला. 'पण मी म्हणते हे नसते उपद्व्याप करायला तुम्हाला सांगितले होते कोणी ?' राधा कडाडली, 'स्वतःला कळत नाही तर मला तरी सांगायचे की बुवा मला बनियन तातडीने हवे आहेत म्हणून !'

कडाडणे पुढे चालू आता ह्यावर श्याम काय बोलतो ! त्याचेच धिरडे होऊन गेले होते.

पण खरी मजा पुढेच आहे काही दिवसानी राधाने परत दोन बनियन आणले. श्यामने आणले होते त्याच कपनीचे—त्याच किंमतीचे व ते साले चागले वर्षभर टिकले. आता सांगा देव बायकाच्या बाजूचा आहे की नाही ? असो.

तसंच एखादा राष्ट्रपती स्वतःच्या जिवावर व हिंमतीवर एखादी गोष्ट करू पाहतो. मग पंतप्रधान त्याचे धिरडे करतात, मग त्याला साहजिकच उबग येतो व आता परत राष्ट्रपतीपदाकरता उभा राहणार नाही वगैरे बोलू लागतो व त्यावेळी पंतप्रधान, राधा हसली तसे 'विचित्र' हसतात व मराठी विनोदी लेखक चागला विषय मिळाला म्हणून एक लेख ठोकून देतात आणि जनतेला उबग आणतात.

श्याम अजुनी राधाच्या हसण्यामुळे निर्माण झालेल्या 'काय करावे कळेना' ह्या रसातच होता. मग त्याने पवित्रा बदलला. 'माझे घरी घालावयाचे कपडे काढले नसतील ना ?' म्हणत तणतणत बेडरूममध्ये गेला. खरं म्हणजे ह्या व ह्यासम प्रश्नाना काही अर्थ नव्हता. राधाने उत्तर दिले असते की 'मी कधीच काढून ठेवत नाही तुमचे कपडे.' पण नवरा कोडीत सापडला म्हणजे असे प्रश्न करतो. त्याचा अर्थ एवढाच की बायकोने ओळखावे की, नवरा खूप रागावला आहे. त्याप्रमाणे राधा ते ओळखते.

श्याम कपडे बदलून येईपर्यंत राधाने आपला पवित्रा बदलला. राधा काय किंवा इतर बायका काय अतिशय बुद्धिमान असतात ! महात्मा गांधी म्हणत 'माझ्या यशाचे रहस्य मला केव्हा थाबावे हे कळले ह्यात आहे !' बायकाना पण नवऱ्याला किती वेळ रागात ठेवावे व केव्हा थाबवावे हे बरोबर कळते.

त्याप्रमाणे राधा हसावयाची थांबून गंभीर झाली होती. श्याम कपडे बदलून येतो तोच ती म्हणाली 'अहो, मी तुम्हाला नाही काही हसले. आज सकाळी सुधाताई सागत होत्या की, त्याच्या बापूसाहेबाना पण अगदी उबग आला आहे म्हणून. त्याची मला आठवण आली व हसू आले हो !'

बापूसाहेब म्हणजे श्यामच्या शत्रू पक्षातले ! राधा त्यांना हसली होती ह्या कल्पनेनेच त्याला 'एअर कंडिशन्ड' वाटायला लागले व ते त्याच्या चेहऱ्यावर दिसले. राधाला कळले की, आपण पहिला विजय मिळवला आहे. तेव्हा ती पुढे जाऊन म्हणाली, 'अहो, बापूना उबग यायला झालंय काय ? स्वत काही करावयाचे नाही, फक्त जे कोणी तुमच्यासारखे काही करतात त्याना नावे ठेवायची !' आता श्याम आणखी खूष.

'पण तुमचे तसे नाही. तुम्ही नाही त्या तात्यासारखे लोकाच्या पुढेपुढे करत, नाही बापूसारखे लोकाच्या सदोदित चुका काढत. तुम्ही योग्य दिसेल ते करता व योग्य असेल ते बोलता !'

आता श्यामला धन्य धन्य वाटू लागले. बायका नवऱ्याची एकदा का स्तुती करू लागल्या की 'हमारी नेता'च्या अनुयायाप्रमाणे कोणाला हटत नाहीत ! त्यापायी त्या भरमसाट खोट बोलतात. नसलेले गुण नवऱ्याला चिटकवतात. नवऱ्याना हे कळत नाही असे नाही; पण वळत मात्र नाही· त्या क्षणाला त्यांना ही स्तुती शंभर टक्के खरी वाटत असते !

अशा तऱ्हेने श्यामचा 'राग-गड' जिंकून झाल्यावर व त्यावर आपला झेंडा वगैरे लावून झाल्यावर राधा श्यामला विचारती झाली, 'का हो पण तुम्हाला कशाचा उबग आला आहे हो ?'

मग श्यामने आपले उबग—पुराण भडाभडा सागावयास सुरुवात केली. श्याम व राधा एका हौसिंग सोसायटीच्या 'ओनरशिप'मध्ये रहात होते. गेल्या वर्षापासून श्याम त्या सोसायटीचा प्रेसिडेन्ट होता; पण कामत हा तरुण व उत्साही सेक्रेटरी फारच स्मार्ट असल्याकारणाने तो श्यामला काहीही न विचारता सर्व कामे करून टाकत असे. जाम अध्यक्ष–बिध्यक्षाना काही विचारत नसे. मग कार्यकारी मंडळाची मीटिंग झाली की त्यात बापू व तात्या ग्रुपचे लोक असे का केले, तसे का केले नाही, असे अवघड प्रश्न विचारून श्यामचा जीव नकोसा करत. म्हणजे इकडे कामत एका प्रश्नाने विचारत नाही व तिकडे बापू व तात्या त्याला शेकडो प्रश्न विचारत असत.

ह्या सगळ्या गोष्टीमुळे श्यामला उबग येणे सहाजिक होते व त्या सहाजिकतेतच तो 'आपल्यालाही फार उबग आला आहे बुवा,' असे म्हणाला होता. आता पुराण सपता संपता परत तेच वाक्य म्हणून तो पुढे म्हणाला, 'आता ह्या मार्चमध्ये आमच्या कार्यकारी मंडळाची मुदत संपते. पुढल्या निवडणुकीला काही मी परत अध्यक्षपदाकरता उभा रहाणार नाही !'

श्याम हौसिंग सोसायटीचा अध्यक्ष असणे राधाच्या दृष्टीने फार आवश्यक होते. नाही म्हटले तरी सोसायटीची ती 'फर्स्ट लेडी' होती. त्यापेक्षा महत्त्वाचे म्हणजे श्याम अध्यक्ष असला म्हणजे सोसायटीतल्या बाकी मेंबर्सच्या उखाळ्या-पाखाळ्या काढावयास लागणारा भरपूर 'डेटा' आपोआपच मिळत असे. त्यामुळे श्याम अध्यक्ष असणे फार नफ्याचे होते.

'अशा वेळी संजीव रेड्डींचे म्हणणे पटते बघ. कोण स्वाभिमानी माणूस परत निवडणुकीकरता उभा राहील ?'

मग ताबडतोब त्याच वेळी राजीनामा का नाही दिला तुमच्या संजीव रेड्डीनी ? राधाच्या अगदी ओठापर्यंत प्रश्न आला होता; पण तोच प्रश्न श्यामलाही लागू पडला असता, म्हणून तिने तो तसाच गिळला व समजुतीच्या स्वरात श्यामजवळ जाऊन म्हणाली, 'अहो, ही आपली सोसायटी आपणच चालवावयाची आहे ना ? आता एखाद्या वेळी उबग येणे स्वाभाविक आहे म्हणून काय परत निवडणुकीला उभेच रहावयाचे नाही ? ह्यात काय होईल की, बापू आणि तात्या लोकाच फावेल ! त्याना नकोच आहेत तुमच्यासारखी honest आणि Hard-working माणस प्रेसिडन्ट व्हायला !'

बापू-तात्याचे नाव काढताच परिस्थितीचे गाभीर्य श्यामच्या लक्षात आले. तो विचारात पडला. आता राधाच्या लक्षात आले की श्यामचे मन जवळजवळ वळले आहे. आता फक्त शेवटचा धक्का दिला म्हणजे झाले.

'त्या रेड्डीना परत अध्यक्ष व्हा म्हणून कोणी सागणार आहे का ? कोणीही नाही ! म्हणून तर हा उबग ! तुमचे तसे नाही. कित्ती कित्ती लोकाना तुम्ही अध्यक्ष म्हणून हवे आहात !'

हे बोलता बोलता राधा श्यामच्या अगदी जवळ गेली व बघता बघत श्यामचा उबग नाहीसा झाला ! □

## संध्याकाळचे पुणे

# अंडे आणि अण्णा सबनीस !

बरेच दिवसांनी 'संध्याकाळचे पुणे' वाचकांना देताना आनंद होत आहे. मध्यंतरी दिवाळीच्या लिखाणामुळे व नंतर काहीसे अनारोग्यामुळे बरेच दिवस हे सदर देता आले नाही. याबद्दल क्षमस्व. आताही ते नियमित देता येईल असे वाटत नाही, त्याबद्दल क्षमा असावी. अधूनमधून जमेल तेव्हा देत राहीन.

**दि. बा. मोकाशी**

श्री. रा. ऊर्फ अण्णा सबनीस लिखित 'परसातील लक्ष्मी' या पुस्तकाच्या आठव्या आवृत्तीचा प्रकाशनसमारंभ मराठा चेंबर ऑफ कॉमर्स संस्थेच्या टिळक पथावरील पदमजी हॉलमध्ये दिनाक १४-२-१९८१ या दिवशी सायंकाळी सहा वाजता साजरा झाला. इ. स. १९५९ साली प्रथम प्रकाशित झालेल्या या पुस्तकाच्या आजपर्यंत सात आवृत्त्या निघून पंचवीस हजार प्रती विकल्या गेल्या. आता प्रकाशित होत असलेली आठवी आवृत्ती पण आधीच संपत आली असे समजले.

अशा या विक्रमी खप झालेल्या पुस्तकाचा विषय 'कोंबडी पाळणे' हा आहे. तुम्ही म्हणाल, कोंबडी पाळण्याचा काय पुस्तकाचा विषय आहे? अगदी 'कुक्कुटपालन' या संस्कृत नावाने संबोधूनही तो भारदस्त वाटत नाही. पण लोकाना आता असेच काही तरी वाचावेसे वाटू लागले आहे. त्याला कोण काय करणार? गेल्या बावीस वर्षांतील विक्रमी विक्री झालेल्या काही पुस्तकाचे विषय पहा. या कालावधीतील सर्वाधिक खपाचे पुस्तक 'अन्नपूर्णा' आहे. हे पुस्तक किर्लोस्कर प्रेसने काढलेले असून पाकक्रियेवरचे आहे. त्याची विक्री तीस हजार झाल्याचे कळले. दुसरे पुस्तक 'परसातील लक्ष्मी' व तिसरे पुस्तक गो. नी. दां. याचे गाडगेमहाराजांचे चरित्र. हे पंधरा हजार खपले म्हणतात! आता ललित लेखन करण्यात अर्थ उरला आहे का सागा!

◻

पुणे 'सकाळ'चे संपादक श्री. ग. मुणगेकर याच्या हस्ते 'परसातील लक्ष्मी'च्या आठव्या आवृत्तीचे प्रकाशन झाले. या प्रसंगी झालेल्या शुभेच्छा सदेशात किर्लोस्कर प्रेसतर्फे सपादक मुकुदरावाचा, पुणे विद्यापीठाचे शेटे याच्या सदेशाबरोबर मौज प्रकाशनातर्फे राम पटवर्धन याचा संदेश होता हे विशेष. कोंबडी व अंडी अशा या विषयाकडे मौज प्रकाशनाचे लक्ष जावे याचा आनंद वाटला. सत्यकथेतील 'परिक्रमा'साठी राम पटवर्धन यांनी सबनीस यांच्या बक्षिसाच्या योजनेची माहितीही मागवली. सबनिसानी आपल्या पुस्तकात अंडे हे बलदायी कसे आहे हे पृथःकरण करून सागितले आहे. ते खरे असेल तर मौज प्रकाशनाचा तोही फायदा होईल. असो.

नंतर किर्लोस्कर मासिकाचे एक निवृत्त सहसंपादक व लेखक वा. ग. तळवलकर यानी अण्णा सबनिसाचा परिचय करून दिला. ते म्हणाले, 'अण्णा ऊर्फ श्री. रा. सबनीस याचा जन्म मध्यमवर्गीय कुटुबात झाला. मॅट्रिक झाल्यावर ते नागपूरला गेले. तेथे जाऊन त्यानी होमिओपॅथीचे शिक्षण घेतले. नंतर अहमदाबादला एका हॉटेलची मॅनेजमेंट हाती घेतली. त्यानंतर मुबईच्या वसंत मासिकाचे ते जनरल मॅनेजर झाले. १९५०-५२ साली आजारी पडले म्हणून विश्रांतीसाठी ते नारायणगावला गेले. आजारात त्याना आहारामध्ये अंडी हवी होती. तेथून जवळच असलेल्या युरोपियन बाईच्या पोल्ट्रीमधून ते अंडी आणीत. ती फार महाग वाटत म्हणून त्यानी कोंबड्या पाळल्या. अण्णाच्या कोंबडीपालनाची अशी सुरुवात झाली.'

◻

अण्णा सबनिसासारख्याच दुसऱ्या एका हकीगतीची इथे मला आठवण येते. दोहोत बरेचसे साम्य आहे. फक्त दुसऱ्या गोलार्धात ही हकीगत घडली आहे. प्रकृती बिघडल्यावर औषधे घेऊन सुधारेना म्हणून एका अमेरिकेतील गृहस्थास डॉक्टरानी शहर सोडून मोकळ्या हवेत राहावयास जाण्याचा सल्ला दिला. त्याने शहरातील नोकरी सोडली आणि बायको व लहान मुले याना मोटारीत घालून शहरातल्या कोंदट हवेला रामराम ठोकला! एका सपाट टेकडीवरील हवेशीर जागा पाहून त्याने तिथे झोपडी बाधली आणि राहू लागला. तेथे काही तरी उद्योग हवा (व अंडीही खावयास हवीत) म्हणून त्याने कोंबडी पाळली. कोंबड्या आणल्या दिवसापासून कोंबड्यानी त्याला छंद लावला. कोंबड्या इतक्या जवळून त्याने कधीही पाहिल्या नव्हत्या म्हणून असेल त्याने ठरविले की, रोजनिशी ठेवावयाची आणि त्याने माळरानावर आल्या दिवसापासूनची रोजनिशी ठेवली सगळे कुटुबच कुक्कुटपालनात गुतले व प्रत्येकाचे रोजचे अनुभव दैनंदिनीत टिपले जाऊ लागले. कोंबडीच्या मागे धावता धावता खळग्यात पाय सापडून आपण कसे पडलो, अशा प्रसंगापासून ते त्याच्या एका मुलाच्या मागे मागे राहणारे कोंबडे जेव्हा मोठे होऊन कापण्याची वेळ आली तेव्हा तो मुलगा त्या कोंबडीला सदऱ्याखाली दडवून कसा बसला, अशा सर्व तऱ्हेच्या विनोदी व गभीर प्रसंगानी दैनंदिनीची पाने भरू लागली असे वर्ष गेल्यावर त्याची प्रकृती सुधारली. तेव्हा परत शहरात जाऊन नोकरीवर रुजू व्हावे असे ठरवून त्याने कोंबडी, अंडी आणि इतर सर्व साहित्य शेजारच्या शेतकऱ्यास विकले!

शहरात आल्यावर त्याने ठेवलेल्या दैनंदिनीची पाने एका मित्राने वाचली. मित्राने ही दैनंदिनी नीट लिहून प्रकाशकाकडे धाडावी असे सुचविले त्याप्रमाणे लिहून त्याने ती एका प्रकाशकाकडे धाडली ती साभार परत आली दुसऱ्यानेही आणि नतर आणखी दोन प्रकाशकानी ती परत धाडली. ती परत

येणार हे त्याला ठाऊकच होते. असले लिखाण कोण मूर्ख घेईल ? पण पाचव्या प्रकाशकाने त्याला धक्का दिला. ते स्वीकारून त्याला ॲडव्हान्स धाडला !

ते पुस्तक ' एग ॲंड आय '–' अंडे आणि मी ' या नावाने प्रसिद्ध झाले आणि चमत्कार घडला. पुस्तक तुफान खपू लागले. टाइम साप्ताहिकात येणाऱ्या उत्तम खपांच्या पुस्तकात ते एक वर्ष सतत पहिले होते. लेखकाला त्या पुस्तकाने हजारो डॉलर्स मिळवून दिले.

वरील पुस्तकातील व श्री. रा. सबनीस यांच्या पुस्तकातील काही घटनांचे साम्य वाचकांच्या लक्षात आलेच असेल. दोघे आजारी, दोघांनी कोंबडीपालन सुरू केले. दोघांची पुस्तके प्रचंड खपली; पण या दोन पुस्तकांत भेद तेवढेच प्रखर आहेत त्यासंबंधी पुढे येईलच.

¤

या समारंभात सबनिसांचा परिचय करवून देणारी पाचएक भाषणे झाली. चिंचलीकर म्हणाले, ' माझा व त्यांचा दहा वर्षांचा परिचय आहे त्यांची कामाची जिद्द विलक्षण आहे–शास्त्रशुद्ध पद्धतीने कोंबड्या पाळल्या तर फायदा होतो हे त्यांनी दाखवले. पोल्ट्रीतले ते महर्षी आहेत !'

पशुसंवर्धनखात्यातले श्री. पोंक्षे म्हणाले, ५९ साली विस्तार अधिकारी म्हणून काम करीत असता लक्षात आले की शेतकऱ्यास पोल्ट्रीची माहिती सांगणे अवघड आहे तेव्हा नारायणगावच्या पोल्ट्री फार्ममध्ये श्री. सबनीस यांनी तयार केलेल्या भितीपत्रकावरून आम्ही शिक्षण दिले पुढे त्यांच्या पुस्तकाने शिकविण्याची मोठी सोय केली. ' डॉ. मोकादार म्हणाले, ' पोल्ट्रीसाठी घेतलेले पस्तीस हजारांचे कर्ज सव्याज फेडणारे श्री सबनीस हे एकमेव होत.' फडकेसाहेब म्हणाले, 'सबनीससाहेबांचे पोल्ट्रीतले कार्य मिशनरी टाइपचे आहे.'

या समारंभास रंगमंच तसा साधा चांगला सजवला होता. व्यासपीठाच्या मागील भिंतीवर ' परसातील लक्ष्मी ' च्या आठव्या आवृत्तीवरचे चित्र मोठ्या कापडी फलकावर लावलेले होते. चित्र चित्रकार फडणिसांचे होते. अंड्यांच्या राशीवर उभी असलेली कोंबडी शेतकऱ्यापुढे अंडे करीत आहे. शेजारी काढलेल्या शेतकऱ्याचा प्रफुल्लीत चेहरा, अंड्यांच्या राशी पडाव्यात हे शेतकऱ्याचे स्वप्न दाखवीत आहे. या पुस्तकातून ते स्वप्न साकार होणार हे उघड आहे. जवळजवळ हा कौटुंबिक समारंभ असल्यामुळे हॉलमध्ये तशी जोराची गर्दी नव्हती. सबनिसांचा चाहता मित्रपरिवार उपस्थित दिसत होता.

स्वतः सबनीस आपल्या भाषणात म्हणाले, ' स्तुति ऐकून घेण्याची मला सवय नाही. आजारी पडल्यावर माझे चुलते नाना यांच्या आग्रहावरून नारायणगावला आलो. माझी अवस्था कठिण होती. मी आजारी होतो आणि बेकारही होतो. मी पाकिस्तानातून निराधार होऊन आलेल्या सिंधी लोकांची धडपड पहात होतो. ते वाटेल ते करीत होते. आपण हमाली करूनही पोट भरावे असे मला वाटू लागले...... हळूहळू माहिती घेऊन मी पंचवीस पिले आणून पोल्ट्रीस आरंभ केला. पुढे ही ३१००० रुपयांची पोल्ट्री स्कीम सुरू केली. नाना म्हणाले तू स्वार्थत्याग करून शंभर रुपयांवर काम कर. मी चार वर्षे रोज बारा तास काम केले. एक पैसुद्धा घेतली नाही.

मी काही लेखक नव्हतो. आपणास कोंबडीतून पैसे मिळाले, तसे लोकांनी मिळवावे या हेतूने मी पुस्तक लिहिले. विद्यार्थीदशेत नाही म्हणावयास सूर्योदय नावाचे मासिक काढले होते. ( प्रत्येकाच्या शाळेतल्या मासिकाचे नाव सूर्योदय का असते याचा विचार झाला पाहिजे.) माणसाला दुर्दम्य इच्छा असेल तर सरस्वती अनुकूल होते. माझ्या पुस्तकाचे वाचक लेखक कसा आहे हे पहायला येतात व पितळी मूर्ती–लेमन सेट अशा भेटीही आणतात.

आपल्या भाषणाच्या शेवटी त्यांनी आपली रा. रं. सबनीस पारितोषिकाची योजना जाहीर केली. ग्रामीण उन्नतिविषयक पुस्तकास हे बक्षीस ठेवले आहे. पुस्तकाचे स्वरूप असे असावे :

(१) ग्रामीण उत्कर्षासाठी उपयुक्त असा माणूस तयार करणे.

(२) हस्तलिखित चालेल.

(३) शब्दसंख्या वीस हजारपर्यंत. छापील डेमी ८० पाने व्हावीत.

(४) निवडलेल्या पुस्तकास १००० रुपयांचे बक्षीस मिळेल.

(५) दरवर्षी फेब्रुवारीअखेर स्पर्धकांनी लिखाण पाठवावे.

अध्यक्षाच्या समारोपाने हा कार्यक्रम संपला. 'सकाळ'चे संपादक मुणगेकर अध्यक्ष होते. सर्वसाधारणपणे वर्तमानपत्राच्या संपादकास अध्यक्ष वगैरेसाठी बोलावण्यात येते तेव्हा निमंत्रकाची आयडिया अशी असते की, या समारंभाचे ठळक फोटो त्या संपादकाच्या वर्तमानपत्रात तरी येतील आणि तसे ते येतातही. संपादकांनी आपलेच फोटो आपल्या पेपरमध्ये टाकल्यास आत्मस्तुतीचा दोष येतो यासाठी फोटो दिले नाहीत तर संपादकांना कुणीही बोलावणार नाही. मुणगेकर बोलू लागल्यावर किंचित खसखस पिकली.कारण 'सकाळ'चा संप चालू होता व एका अर्थाने मुणगेकरांना दिलेले स्थान व्यर्थ ठरले होते, हे नकळत श्रोत्यांच्या मनात येऊन त्यांनी अनाहूत दाद दिली. मला वाटतं मुणगेकरांनीही त्यावर विनोद केला. ते आपल्या भाषणात म्हणाले,

' सबनीस हे कष्टाला देव मानणारे आहेत. जो शेतकरी कुटुंबाचे पोषण करण्यास धडपडतो त्यासाठी त्यांचे पुस्तक आहे ते एका कल्पनेचे जनक आहेत. '

यानंतर लीलाताई काटदरे यांनी आभार मानल्यावर समारंभ संपला.

¤

आधी मी ' एग ॲंड आय ' या व ' परसातली लक्ष्मी ' या दोन पुस्तकांतले साम्य दाखविले होते. दोन्ही लेखकांनी आजारी पडल्यामुळे कोंबडीचा उपयोग सुरू केला. दोन्ही पुस्तके प्रचंड खपली. इथे दोन्ही पुस्तकांतले साम्य संपते आणि भेद सुरू होतात

' थर्ड वर्ल्ड ' म्हणून एक शब्दप्रयोग हल्ली रूढ आहे, ' थर्ड वर्ल्ड ' मध्ये आशियातील आपल्या देशासारखे मागासलेले, परावलंबी देश येतात. हा एक गट दुसऱ्या गटात अमेरिकेसारखे संपन्न, गरीब देशांना सहाय्य देणारे देश येतात. वरील दोन पुस्तके मला या दोन जगातील भेद दाखविणारी चित्रेच वाटली. दोन्ही पुस्तकांचे लेखक आरोग्यासाठी शहर सोडून खेड्यात जातात व उद्योग हवा म्हणून कोंबडी पाळू लागतात. दोघेही त्या अनुभवावर पुस्तक लिहितात. ' एग आणि आय ' चा अमेरिकन लेखक गमतीदार

अनुभव म्हणून रोजनिशी ठेवतो व त्याचे पुस्तक होते. वाचकाना ही त्यातली गंमत कळते व ते लोकप्रिय होते. त्याच्या देशांतील समृद्धी एवढी आहे की, कोंबडीपालनात राष्ट्रहित, समाजसेवा, ध्येयवाद किंवा नीतिवाद दिसत नाही. त्या लोकानी याच्या कितीतरी पुढचे अनुभव घेतलेले आहेत. चंद्रावरून त्यानी जग पाहिले आहे. त्यांच्या समृद्ध जगातल्या देशानी दोन महायुद्धांचे प्रखर अनुभव घेऊन माणसाच्या मनाच्या सर्व बऱ्या–वाईट छटा अनुभवल्या आहेत. समृद्धी व हालअपेष्टा, मृत्यूचे आघात यांची परमावधी त्यानी अनुभवली आहे. तिसऱ्या जगातील एका लेखकाने म्हटले आहे की, पहिल्या जगातील लोकांची तोड तिसऱ्या जगातील लेखक कधीही करू शकणार नाहीत, हे काही वेळा खरे वाटते.

उलट तिसऱ्या जगातील एक आजारी माणूस कोंबड्या पाळून पुस्तक लिहितो ते कसे लिहितो पहा. आपल्या देशातील लोकातला आळस, चिकाटीचा अभाव इत्यादीवर तो कडाडून हल्ला चढवीत ग्रंथास आरंभ करतो. देशातील दारिद्र्य जावे यासाठी त्याची तगमग होत असते. 'परसातील लक्ष्मी' या पुस्तकातच पहा.

चिनी लोकांनी स्वतःची कशी प्रगती करून घेतली हे सांगताना ते लिहितात– 'त्यानी स्वतःचे ओझे परमेश्वरावर लादले नाही. 'विठोबा देईल खाटल्यावरी' असे म्हटले नाही हात–पाय गाळून कपाळाला हात लावून बसण्यातच आम्हाला शहाणपण वाटते ... ॲटमबॉंब पडूनही एवढ्याशा जपान्याने आपली मान पुन्हा उच सरसावली आहे.' जपानी शेतकरी किती तऱ्हेचे उद्योग करीत असतो हे सांगून ते म्हणतात– 'पाहा ही कष्टाची कमाल!'

खरकटे विकणारे, मैला विकणारे चिनी सांगून ते म्हणतात– 'तर मग आता आपण काय करणार? आपल्यालाही पुष्कळ करता येण्यासारखे आहे असे वाटते ना तुम्हाला? घाबरावयाचे कारण नाही. उगीच अडचणीचे डोंगर उभे करू नका! काम करण्याची श्रद्धा असणे हे सर्वांत महत्त्वाचे...'

मग बुद्ध, रामदास, शिवाजीमहाराज यांनी श्रद्धेच्या जोरावर केवढे कार्य केले हे सांगून ते लिहितात, 'सरकारने सर्व काही तोंडात आणून सोडले पाहिजे अशी वृत्ती बळावत आहे; पण स्वत:चे उत्पन्न वाढवून कररूपाने आपण सरकारला सधन केल्याशिवाय सरकार तरी काय देणार?... स्वराज्यातील प्रत्येक माणसाने प्रामाणिकपणे रोज आठ–दहा तास उपयुक्त काम केले पाहिजे. अमेरिकन लोकानी तरी एवढा पैसा आणला कुठून? साऱ्या तीनशे वर्षांतील ती वसाहत आणि खरे म्हणजे पाउणशे वर्षांतील ही सुधारणा! आम्ही उगीच पाच हजार वर्षांच्या संस्कृतीच्या गप्पा माराव्याच्या! भूतकालावर आम्ही जगू इच्छितो. का, तर काम टाळायला हवे...अमेरिकेत दर चार माणसांमागे मोटार कशामुळे पळते? याचे कारण कष्ट–केवळ हमालीचे कष्ट नि बुद्धीचे कष्ट...स्वतःसाठी पैसे वापरून वर मागासलेल्या देशांना ते अब्जावधी रुपये देत आहेत ... आपले जीवन उंचावले पाहिजे...आपली परिस्थिती सुधारली पाहिजे...जीवनाला जरूर त्या गोष्टी मिळायला हव्यात, घर, अन्न, शिक्षण या प्राथमिक गरजा भागल्या पाहिजेत. मुलाबाळाना दूध–तूप–अंडी मिळून ती सशक्त झाली पाहिजेत...'

¤

श्री. सवनीस याच्या 'परसातील लक्ष्मी' मधील आणखी उतारे देता येतील. त्यांची जाज्वल्य देशभक्ती, देशातील गरिबी हटावी ही कळकळ शब्दाशब्दात आहेच; पण जेव्हा प्रथम माझी व त्यांची माजगावकराबरोबरच्या पदयात्रेत ओळख झाली तेव्हाच त्यांच्या जाज्वल्य देशाभिमानाने मी दिपून गेलो. मला वाटते त्या वेळी ते इस्राएलला जाऊन आले होते. 'मला एक गंगा द्या, मी इस्राएलचे नंदनवन करीन,' असे एका भारतात आलेल्या इस्राएलीने म्हटलेले सर्वत्र गाजत होते. वाळवटात पिके उभे करण्याचे इस्राएलचे कर्तृत्व सांगताना सवनीस इतके आवेशात येत!

जर हा देश वाढत्या लोकसंख्येखाली दबलेला नसता, जर हा देश दरिद्री, मागासलेला व परावलंबी नसता तर सवनीसासारख्या कर्तृत्ववान माणसाची शक्ती कोंबडीपालन शिकवण्याआधी हे सर्व लोकांना समजण्यात खर्च झाली नसती. मात्र एकदा आरंभी लोकांना जागे व्हा–जागे व्हा, सांगून झाले की सवनीस पुस्तकात पुढे कोंबडीपालनाचे शुद्ध शास्त्रच फक्त सांगतात हे विशेष आहे आज त्याचे पुस्तक खेडोपाडी गीता झाले आहे ते उगीच नव्हे!

¤

'परसातील लक्ष्मी' या पुस्तकाने आणखी एक परिवर्तन घडवून आणले आहे. पुढे कोंबडा, मागे कोंबडी व तिच्या भोवताली तुरुतुरु धावणारी दहा–बारा पिले, असा काव्यमय देखावा खेडोपाडी दिसणार नाही. बारा पिल्लात मोठ्या ऐटीने चाललेली ती कोंबडीमाता पाहूनच संततिनियमनाच्या प्रचारास स्त्रियाकडून विरोध झाला असे म्हणतात.

आतापर्यंत शेतकरी कोंबडीला पाळतो की कोंबडी शेतकऱ्याला पाळते, हे कळत नसे. शेतकऱ्याएवढाच त्याच्या झोपडीचा कोंबडीकडे कबजा असे. कुडाला भोके पाडून तिने आपणासाठी वेगळे दरवाजे केलेले असत. सध्याकाळ झाली की पिलाना घेऊन व कोंबड्याला पुढे घालून ती झोपडीत येई. शेतकऱ्याची मुलगी पिलावर हारा उपडा टाकी. पहाटे कोंबडा आपली देवदत्त कामगिरी पार पाडी. सकाळ होताच कोंबड्याचे हे कुटुंब बाहेर पडे मग या आवारातून त्या आवारात बयावयातून शिरत, वाळवणावर हल्ला करीत गावभर हे कुटुंब हिंडे व संध्याकाळी पुन्हा परत येई. एखाद दिवशी मोठे झालेले पिल्लू कमी येई. मग शेतकऱ्याची बायको दारात उभी राहून पिल्लू चोरणाऱ्याचे नाव न घेता त्या चोराला शिव्या–शाप देई. ज्याने पिल्लू चोरले असेल त्या शेजारणीला अर्थातच ते लागे व ती 'कुणाला शिव्या देतेस?' म्हणून जाब विचारी. लोकरच तिचा नवरा तिच्या मदतीला येई. मग दोघींचे नवरे भाडू लागत. लवकरच सबध गावात दोन तट पडत. बराच वेळ खणखणाट चाले. शेवटी कंटाळून जो तो घरात गला को आळी शात होई.

श्री. सवनिसांच्या शास्त्रशुद्ध कोंबडीपालनाच्या प्रचाराने आता यापुढे खेड्यापाड्यातून हे नाट्य नाहीसे होईल! तसेच शेतकऱ्याला अंडी मिळतील, पण कोंबडीचे स्वातंत्र्य जाईल हेही लक्षात यावे.

□

चित्रपट

# अॅटनबरांचा ' गांधी ' काय साधू पाहत आहे ?

सतीश जकातदार

' महात्मा गांधी ' या विसाव्या शतकातल्या विभूतीवर विसाव्या शतकातच चित्रपट काढून 'गांधींची' हुबेहुब पुनर्निर्मिती करायची, हे एकच ध्येय उराशी बाळगून सर रिचर्ड अॅटनबरा या ब्रिटिश कलावंताने ' गांधी ' या आपल्या आगामी चित्रपटाचे चित्रीकरण खास ब्रिटिश पद्धतीने अर्धअधिक पूर्ण केले आहे.

२६ नोव्हेंबरला दिल्लीत पारपारिक पद्धतीने मुहूर्त करून अॅटनबरानी आपल्या तीन तासाच्या चित्रपटातील शभर मिनिटाचे चित्रीकरण दिल्ली-मुंबईत उरकले आहे. २१ आठवड्यात संपूर्ण चित्रपटाचे चित्रीकरण उरकायचे या इरादाने अॅटनबरानी दोनशे साहाय्यक कलाकार-तंत्रज्ञासह सध्या पुण्याच्या पचतारांकित हॉटेलात बस्तान साडले आहे. पुण्यातील वीस दिवसाच्या चित्रीकरणाचा तिसरा हप्ता पूर्ण करून ' गांधी युनिट ' पाटण्याला रवाना होणार आहे.

चित्रपटाच्या मुहूर्तापूर्वीच ' गांधी ' चित्रपट वादग्रस्त ठरला तो दोन कारणामुळे. ' गांधी ' चित्रपटाला राष्ट्रीय चित्रपट विकास महामंडळातर्फे पाच कोटी भाडवल पुरविण्याच्या भारत सरकारच्या निर्णयामुळे, तर दुसरीकडे पटकथेबाबतच्या साशकतेतून अनेकानी हा गांधीजींच्या सिद्धान्तावर बलात्कार असून, आमच्या राष्ट्रीय अस्मितेचाच अपमान असल्याची आरोळी ठोकली.

अनेक महिने या वादग्रस्त चित्रपटावर वादळी चर्चा झाली. देशप्रेम वगैरे इतरावर सोपविणाऱ्या व पैसा या एकाच ध्येयाने प्रेरित झालेल्या भारतीय चित्रपट उद्योगाने याबाबत ' मौन ' पाळले, तर कलात्मक चित्रपट दिग्दर्शकाच्या विरोधी फळीने हा अनाठायी खर्च असून, या पैशाचा विनियोग कलात्मक चित्रपटाच्या चळवळीसाठी केला जावा, अशी मागणी केली. काहीनी म. गांधीवर चित्रपट काढण्याचा भारतीयाचा जन्मसिद्ध हक्क असल्याचा दावा केला. अर्थात, या सर्व वादग्रस्त परिस्थितीला झुगारून सर रिचर्ड अॅटनबरा यानी भारत सरकारची अनुमती व सहकार्य मिळविले. पंतप्रधान इंदिरा गांधीसह अनेकानी त्याच्या पटकथेवर शिक्कामोर्तब केले व ' अवघ्या ' सोळा कोटीच्या ' गांधी ' चित्रपटाची निर्मिती धामधुमीत सुरू झाली.

पुण्यात गांधी युनिटने महात्मा गांधी रस्त्यावरील पुलगेटापाशी दक्षिण आफ्रिकेतल्या ' जोहान्सबर्ग ' या उपनगराचीच उभारणी केली आहे, तर फर्ग्युसन कॉलेजमध्ये द. आफ्रिकेतील मशीद व इंपिरिअल थिएटरची उभारणी केली आहे. आगाखान पॅलेसचा परिसर तर ' ताब्यात 'च घेतला आहे. गांधींच्या समकालीन काळाचे भान ठेवणारा व याद देणारा परिसर जसाच्या तसा उभा करण्यासाठी अॅटनबराच्या इंडो-ब्रिटिश फिल्मसृचे दोनशे विशेषज्ञ-तंत्रज्ञ आपल्या हजारो भारतीय व ब्रिटिश सहाय्यकांसह गेले वर्षभर अहोरात्र झटत आहेत.

पुण्याच्या चित्रीकरण परिसरात एखादाच फेरफटका मारल्यावर गांधींच्या काळातील परिसराची हुबेहुबपणे पुनर्निर्मिती करण्यात ही मंडळी दाद देण्याइतपत यशस्वी झाली आहेत, याची खात्री पटते. अतिशय बारीक-सारीक तपशील, त्या काळातील परिसराचे अचूक आकलन, आहे तसं अस्सलपणे त्याच स्वरूपात उभं करण्याची जिद्द आणि कष्ट या मंडळीजवळ आहेत याचीही खात्री पटते.

अर्थात यामागे अॅटनबरानी ब्रिटन, भारत सरकारकडून जमविलेल्या सोळा कोटी रुपयांचे आर्थिक पाठबळ आहे, हे नाकारण्यातही काही अर्थ नाही ! त्याचे विशेषज्ञ-तंत्रज्ञ ' सेट ' उभारण्याच्या कलाकुसरीत आधुनिक पद्धतिसह निष्णात आहेत, निपुण आहेत. पाश्चात्य चित्रपटातून आपल्या तंत्र-कौशल्याची प्रचिती दाखविणाऱ्या तंत्रज्ञाचा यात समावेश आहे. ' सुपरमॅन ' या चित्रपटाचे प्रॉडक्शन डिझायनर स्टुअर्ट क्रेग, ' पॅपिलॉन ', ' स्टार वॉर्स ' या चित्रपटाचा कन्स्ट्रक्शन मॅनेजर डिक क्रिफ्ट, कलादिग्दर्शक नॉर्मन डोर्मे या विदेशी विशेषज्ञासह अमल आणि निसार अॅलना या भारतीयाचाही यात समावेश आहे. पटकथेतील १८९ दृश्याना १३६ सेट्सची अवश्यकता असून या मंडळीनी ते उभे केले आहेत. फक्त सेट्सची उभारणी करण्यासाठी सुमारे एक कोटी रुपये खर्च करण्यात येणार असून त्यातील एक चतुर्थांश रक्कम केवळ साबरमती आश्रम, जालीयनवाला बागेसाठी खर्च झाली आहे.

या डिझाइन मेकर्सनी सर्व प्रकारच्या ऐतिहासिक सामुग्रीचा, वास्तुशास्त्राचा व उपलब्ध छायाचित्रासह इतर सोयीचा उपयोग करून घेऊन व तो काळ प्रत्यक्ष पाहिलेल्या हजारो लोकाशी संपर्क साधून, सखोल ' रिसर्च ' करूनच दाद मिळविणारा हा हुबेहुबपणा सादर केला आहे.

वेषभूषा आणि रंगभूषेतही हे ' हुबेहूब 'पण टिकविण्याचा अॅटनबराच्या विशेषज्ञानी चगच बाधला आहे. या ठिकाणी वेषभूषेसाठी जॉन मॅलो आणि भानू अथिय्या, रगभूषेसाठी टॉम स्मिथ आणि केशभूषेसाठी पाला गिव्हसे याचे सर्वथैव प्रयत्नच चित्रपटातील ' फिजिकल अॅपिरिअन्स ' हुबेहूब बनविण्यास कारणीभूत आहेत. महात्मा ' गांधी 'सह त्याचे समकालीन सरदार पटल, नेहरू, जीना, मौलाना आझाद, कस्तुरबा, गोखले याच्या प्रतिमा भारतीय मनावर पूर्णपण ठसलेल्या आहेत. त्यामुळे हुबेहूबपणातील विसगती ओळखणं, त्याची तुलना होण साहजिक आणि स्वाभाविक आहे. आणि हे गृहित धरूनच या मंडळीचे प्रयत्न चालू आहेत.

हुबेहुबपणाला आकार व उकार देणाऱ्या या तंत्रज्ञाबरोबरच यातील ऐतिहासिक व्यक्तीच्या सर्व हालचालीचे, त्याच्या व्यक्तिमत्वातील विविध पैलुचे योग्य आणि साजेसे भान ठेवून ही व्यक्तीमत्व साकारणाऱ्या व तशा प्रकारची अभिनयक्षमता असणाऱ्या कलावंताचा ताफाच अॅटनबरानी जमविला आहे.

गेली वीस वर्षे ब्रिटनच्या रगभूमीवर गाजणारा बेन किग्स्ले महात्मा गांधींच्या भूमिकेत आहे, तर कस्तुरबाच्या भूमिकेत रोहिणी हतगडी आहे. ए मिडसमर नाईटस् ड्रिम या चित्रपटातील अभिनेता रोशन सेथ पंडित नेहरू बनला आहे, तर सत्यजित रायच्या ' शतरंज के खिलाडी ' या चित्रपटातील हरहुन्नरी मीरसाहेब फेम सईद जाफ्री सरदार पटेलाची भूमिका करत आहे. आक्रोश व निशांतमधील अभिनेता अमरीश पुरी गांधींच्या द. आफ्रिकेतील पुरस्कर्त्या खानच्या

भूमिकेत तर डॉ. श्रीराम लागू नामदार गोखल्यांच्या भूमिकेत आहेत. मुंबईच्या रंगभूमीवर गेली तीस वर्षे गाजत असलेले अॅलेक् पदमसी कायदे आझम जिनाच्या भूमिकेत आहेत, तर मेहाच्या भूमिकेत नाना पळशीकर आहेत.

याशिवाय लॉर्ड आर्यविन, लॉर्ड चेम्सफर्ड, जनरल डायर, मार्गारेट बोर्के-व्हाईट व मीरा बेन यांच्या भूमिकेत ब्रिटिश रंगभूमी व चित्रपटातून गाजलेले सर जॉन मिलयुड, सर जॉन मिल्स, एडवर्ड फॉक्स, कॅन्डीस बर्गन, जेसव्हिन जेम्स ही कलाकार मंडळी आहेत.

या सर्वांच्या समुच्चयाने जो चित्रपट तयार होणार आहे तो एखादे वेळी अगदी वरपांगी हुबेहूब असेलही; पण केवळ 'हुबेहूबपणा'च एखाद्या ऐतिहासिक चित्रपटाची कसोटी आहे का ? तर नाही. हुबेहूबपणा साकारण्याचं कौतुक जरूर आहे किंवा तो काळ 'अस्सल'पणे उभा करण्याची जिद्द स्पृहणीय आहे; पण केवळ त्याचंच कौतुक करणं किंवा फक्त त्यावरच भर देऊन चित्रपटाची निर्मिती करणं हा पोकळपणा आहे. हुबेहूबपणाचा आग्रह जरूर असावा; पण हट्ट नसावा, कारण त्यालाही स्वाभाविक मर्यादा आहेत. हुबेहूबपणापेक्षा ती भूमिका सक्षमतेने साकारण्यालाच महत्त्व आहे. 'डेझीरे' या चित्रपटात बुटक्या नेपोलियनची भूमिका उंच मार्लन ब्रँडोने करून सुद्धा त्याच्या उत्तुंग अभिनयामुळे ती खटकली नाही आणि खरं तर पैशाचं पाठबळ असेल तर तो हुबेहूबपणा अस्सलपणे उभारण्याइतके आधुनिक तंत्रज्ञान आज अवगत आहे. बेनहूर, क्लिओपात्रापासून २००१ स्पेस ओडेसे चित्रपट. पाश्चात्य तंत्रज्ञ काय वाटेल ते उभे करू शकतात याचेच द्योतक आहेत. तांत्रिक व कलात्मक सफाई आज पाश्चिमात्यांप्रमाणे भारतातही आहे. (बन्सी चंद्रगुप्त यांचे शतरंज खिलाडी व सईद यांचे मुगले आझममधील कला दिग्दर्शन) तेव्हा गांधी चित्रपटाबाबत आग्रहापेक्षा हुबेहूबपणाचा हट्टच अधिक आहे, त्याचे कौतुकही थोडे प्रमाणाबाहेर आहे. कौतुक करायचेच असेल तर पैशाच्या रिस्कचे करावे लागेल.

मग प्रश्न पडतो, ही सोळा कोटींची उधळपट्टी करून हा अट्टाहास कशासाठी ? गांधीच्या व्यक्तिमत्वाने भारावलेल्या एका ब्रिटिश असामीचा हा निर्मितीक्षम विक्षिप्तपणा आहे का हुकमी गल्ला गोळा करण्याची ही नामी युक्ती आहे ? या प्रश्नाच्या उत्तरासाठी आपल्याला अॅटनबराच्या धडपडीचा जसा शोध घेणं भाग आहे तसंच पटकथेचा मागोवा घेणंही अपरिहार्य आहे. यातूनच अॅटनबराची समज आणि इतरांचे गैरसमज याचं निराकरण करणं शक्य आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर ब्रिटिश चित्रपटातील नामवंत अभिनेता म्हणून मान्यता पावलेल्या ५७ वर्षीय रिचर्ड अॅटनबरा आपल्या 'ओ, व्हॉट ए लव्हली वॉर' आणि 'ए ब्रिज टू फार' या चित्रपटानंतर 'गांधी' या महत्त्वाकांक्षी चित्रपटकल्पनेबाबत बोलताना म्हणतात की, 'अठरा वर्षांपूर्वी मी प्रथितयश अभिनेता आणि सहनिर्माता यात सुखद समाधान मिळण्याइतपत निश्चितच सुस्थापित झालेलो होतो. माझ्याजवळ खूब्बळ पैसा होता आणि त्याची सुरक्षित गुंतवणूकही मी केली होती याच वेळी माझे मित्र मोतीलाल कोठारी यांनी लुई फिशर यांचे गांधीचे चरित्र माझ्या हातात ठेवले आणि माझ्या जीवनविषयक धारणेत बदल होण्यास या पुस्तकाने मला प्रवृत्त केले. निव्वळ उत्सुकतेने मी ते वाचले आणि अक्षरश: मी मंत्रमुग्ध झालो.'

गांधीच्या चरित्राने भारावलेल्या या गृहस्थाने मग पुढील अठरा वर्षे एकच ध्यास घेतला—'गांधी' चित्रपट निर्मितीचा. अनेक चित्रपटातील भूमिका नाकारून सर रिचर्ड यांनी ४० वेळा भारताचा दौरा केला. या काळात त्यांनी गांधीवरील अधिकृत माहिती देणारी सर्व छोटी-मोठी पुस्तके, गांधीजींचे आत्मचरित्र, त्यांच्या सहकाऱ्यांची चरित्रे, शक्य ते सारं वाचलं अनेक संग्रहालये त्यांनी धुंडाळली सुमारे चारशे पुस्तके नजरेखाली घालून सखोल अभ्यास केला. पंडित नेहरूंसह अनेक गांधीवादी नेत्यांच्या भेटी व सल्ला घेतला. योग्य ते फेरफार व विसंगतीची काटछाट करूनच पटकथा तयार करण्यात आली.

## पटकथा काय सांगते ?

महात्मा गांधीइतका निर्मल, अधिक उदात्त, निर्भय व अधिक उन्नत जीव या भूमीवर कधीच वावरला नाही. हिंसा, क्रौर्य आणि मानवतेची पायमल्ली यांच्या विरोधात उभ्या राहणाऱ्या सर्वव्यापी आणि वैश्विक अशा मानवाचा शोध घेत, ब्रिटिश साम्राज्यसत्तेशी आपल्या अमोघ सत्याग्रहाच्या अस्त्राने झुंज देत, स्वत:तल्या उणीवांशी अंतस्थ लढा देत जगणाऱ्या गांधींचा ७५ वर्षांचा जीवनपट तीन तासांच्या चित्रपटात बंदिस्त करण्याचा घाट अॅटनबरांनी मोठ्या धाडसाने घातला आणि म्हणूनच त्याची पटकथा काय सांगते ते पाहणे आवश्यक आहे.

जेम्स ब्रायली यांच्या पटकथेची सुरुवात (नामावलीनंतर) बिर्ला हाऊस परिसरात होते. गांधींचा खून या घटनेने होते. नथुराम गोडसेने गांधींचा खून केल्यानंतर या दृश्याचे रूपांतर दिल्लीतील गांधींच्या शोकमग्न प्रेतयात्रेत होते. गांधींचा शांत, धीरगंभीर चेहऱ्याचा क्लोजअप घेऊन कॅमेरा दक्षिण आफ्रिकेच्या दिशेने वाटचाल करतो. वर्णद्वेषाचा अॅटर्नी गांधींचा पहिला अनुभव, आफ्रिकेतील चळवळ, गांधी-कस्तुरबा संबंध, गांधींचे भारतात आगमन व स्वागत, पटेल-गांधी, गोखले-गांधी यांच्या संभाषणाचा मागोवा घेत गांधींचा भारतभर दौरा, जालीयनवाला बाग हत्याकांड, गांधींची प्रतिक्रिया आणि जीना, आझाद, नेहरू, पटेल यांच्यासह चर्चा इत्यादी घटनांची नोंद घेत, साबरमती आश्रम परिसरातील दृश्ये, चंपारण्य उठाव, दांडीयात्रा, मिठाचा सत्याग्रह या प्रमुख घटनांची नोंद घेऊन, जीनांची पाकिस्तान मागणी इत्यादी प्रमुख घटनांचा संदर्भ घेत पटकथेत गांधींचं जीवन उभं करण्यात आलं आहे.

*गांधीजींच्या व्यापक आयुष्याचे तीन तासात बंदिस्त करूनच* पटकथेने आकार घेतला आहे. याबाबत अॅटनबरा म्हणतात "माणसाचं आयुष्य पालटून टाकणाऱ्या 'सत्याचे प्रयोगा'च्या गांधीजींच्या आयुष्यातील नाट्यपूर्ण कालाबरोबरच गांधीजींनी जो इतिहास घडविला त्याचेही भान आम्ही ठेवले आहे. तो आमच्या चित्रपटाचा मुख्य गाभा आहे."

*अॅटनबराचा 'गांधी' असा आहे. तर मग प्रश्न पडतो की, ही विसाव्या* शतकातली विभूती पुन्हा त्याच वेषात, ढंगात, त्याच काळाच राजकीय सामाजिक भान ठेवून, याच विसाव्या शतकात, चित्रपटासारख्या संस्कारक्षम माध्यमातून पुन्हा एकदा उभी करण्याची काय गरज ?

गरज आहे. ती कोणीच नाकारीत नाही. महात्मा गांधीसारखा आदर्श मानव आजच्या भ्रष्ट, मूल्यहीन समाजव्यवस्थेत जोपासण्याची, त्याला थोडा फार गोंजारण्याची अपरिहार्यता आहे. आदर्श जोपासण्यात कोणतीच हरकत नसते पण हे आदर्श कोणत्या काळात निर्माण झाले, हे पाहताना, इतिहासाची पानं उलगडताना, आम्ही समकालीन संदर्भात या आदर्शांची मांडणी या संस्कारक्षम माध्यमातून करणार आहोत की नाही, हा प्रश्न आहे गांधी चित्रपटाच्या निमित्ताने तो घसास लावणे आग्रहाचे आहे.

इतिहास आहे तसा चित्रपटातून उभा करणारी माणसं भारतासह

जागतिक चित्रपटसृष्टीत नाहीत असं नाही! खरं तर ऐतिहासिक चित्रपटाची लांबच लांब नामावलीच आमच्याकडे अगदी सोहराब मोदींपासून अलीकडच्या नचिकेत पटवर्धनापर्यंत. यात काही चांगले प्रयत्न आहेत, काही अयशस्वी प्रयत्न देखील आहेत. पण एक मात्र निश्चित, काही चित्रपटाचा अपवाद वगळता सर्वांनीच आजच्या प्रेक्षकाला त्या काळात नेण्याचे 'कंत्राटच'च घेतलेल्याच्या थाटात आपल्या कलाकृती सादर केल्या. समकालीन वास्तव विसरून प्रेक्षक तीन तासापुरता त्या काळात वावरत असला तरी तो थिएटरबाहेर पडल्यानंतर मात्र कळत-नकळत इतिहासाचे पोवाडेच गाताना दिसला.

कोणत्याही ऐतिहासिक घटनेचे अथवा त्या घटनेशी निगडित प्रातिनिधिक स्वरूपातील व्यक्तीचे, त्याच्याबद्दलच्या लिखित स्वरूपाच्या माहितीच्या आधारे, इतिहासकार, त्यातील अनेक पैलूमागील बारकावे तपासतो, त्यांची तपशीलात चौकशी करून त्यावेळच्या समाजव्यवस्थेचे विश्लेषण करतो. एखाद्या ऐतिहासिक घटनेवर अथवा महामानवावर चित्रपट काढावयाचे कार्यसुद्धा याच प्रकारचे असते. मात्र आहे तो इतिहास त्या काळाच्या वेषात उभा करणे एवढ्यापुरतेच मर्यादित नसते त्या काळातील सामाजिक संबंधांचा, व्यवस्थेचा, सद्यःपरिस्थितीतील सामाजिक संबंधाशी, व्यवस्थेशी सांधा जोडून ती कलाकृती सादर करणे, हा त्याचा खरा उद्देश असतो.

गांधीजीच्या मृत्यूला आज ३२ वर्षे लोटली आहेत. गांधीवादाची Sole Monopoly सांगणाऱ्या आमच्या कॉंग्रेस सरकारने त्याच्या 'रामराज्य' कल्पनेचा केलेला पार विचका या काही वर्षात आमच्या पिढीने पाहिला आहे तेव्हा ५ कोटीची देणगी व चित्रीकरणासाठी फौजफाटा देणाऱ्या या शासनाने, २० कोटीच्या या चित्रपटातून काय साधले जाणार आहे, याचा पुरेसा, सबळ विचार केला आहे का, ह्याही प्रश्नाचा निकाल चित्रपटाच्या प्रदर्शनानंतर लागणार आहे. का भारतीयाच्या दृष्टीने नुकत्याच सरलेल्या काळातील गांधीच्या सामाजिक व वैयक्तिक जीवनातील घटनांची क्रमवार दृश्य मांडणी, इतपतच त्याचे स्वरूप राहणार आहे, हेही उघड होणार आहे.

ॲटनबरानी हा चित्रपट बनविला कोणासाठी? एका मुलाखतीत खुद्द रिचर्डसाहेब म्हणतात, 'इंदिरा गांधीचे वडील महात्मा गांधी आहेत असं समजणाऱ्या प्रेक्षकासाठी माझा चित्रपट आहे!' ॲटनबराचा अपेक्षित प्रेक्षक भारताबाहेर असून त्यांच्या तो पचनीही पडेल; महात्मा गांधी इंदिरा गांधीचे वडील नव्हते याबरोबरच महात्मा गांधीच्या जीवनाबाबत आणखीनही माहिती त्यांना या चित्रपटातून मिळेल. चित्रपट पाहून काही भारावतील, तसे काही टीकाही करतील एवढं मात्र निश्चित की, 'गांधी' जागतिक बाजारपेठेत यशस्वीपणे विकला जाईल. ॲटनबरासह भारत सरकारलाही खब्बूळ पैसा मिळेल, शिवाय राष्ट्राची अस्मिता जोपासणाऱ्या नेत्याची भारताबाहेर प्रतिमा केल्याचा डांगोराही सरकारला पिटता येईल.

पण भारतीय प्रेक्षकाला यातून काय मिळेल ही शंकाच आहे. 'गांधी युनिट'मध्ये रोजगार मिळाल्याचा अपवाद वगळता 'पुन्हा एकदा गांधीजी पडद्यावर' असंच दिसेल का आणखीन काही, ते येतं वर्षच ठरवेल!

'गांधी' चित्रपटाबाबत ॲटनबरा तपशीलात कमी पडतील असंही नाही किंवा त्यांच्या प्रामाणिक धडपडीविषयी शंका आहेत असंही नाही. कलात्मक व तंत्रदृष्ट्या चित्रपटाचा दर्जा चांगलाही असेल, तो असावा अशी त्याची मेहनत आहे. ॲटनबरा सोळा कोटी खर्च करतात याबाबत दुमत नाही, कारण चित्रपट माध्यम खर्चिक आहे हे निर्विवाद. ते त्यानी खाजगी निर्मिति म्हणून खर्च केले असते तर प्रश्न वेगळा. परंतु भारत सरकारच्या मदतीने चित्रपटाची निर्मिती होत आहे. तेव्हा निर्मितीमागचा हेतू स्पष्ट असणं आवश्यक आहे. तो कितपत चूक आहे की बरोबर आहे, हे आज तरी सांगणं अशक्य आहे. आज तरी तो संदिग्ध आहे. 'गांधीजी तुमचे होते, तसे आमचेही होते, आहेत?' हे ॲटनबरा म्हणतात तेही खरं, पण केवळ हे सिद्ध करण्यासाठी सोळा कोटीची उधळपट्टी नको.

उधळपट्टीचा अर्थ 'भारतासारख्या गरीब देशाला परवडण्यासारखं नाही वगैरे.....!' अशी काही स्टोनएज्मधील पुढाऱ्याची री ओढणे हा नाही. परंतु समकालीन वास्तवाचे भान न ठेवता हेतूविरहित चित्रपट निर्मिती करून ॲटनबरांना काय 'सचित्र गांधीजी' या बालासाठी असलेल्या पुस्तिकेचे, अत्याधुनिक पॅनव्हिजन तंत्राच्या साह्याने दृश्य रूपांतर करावयाचे आहे?

पण या प्रश्नावर सध्या तरी थांबणे आवश्यक आहे! □

## गांधी पडद्यावर तिसऱ्यांदा

काही वर्षांपूर्वी श्री. विठ्ठलदास जव्हेरी यानी अनेक वार्तापटाचे संकलन करून महात्मा गांधीच्या जीवनावर सुमारे साडेपाच तासाचा एक प्रदीर्घ वार्तापट काढला होता. तुकड्यातुकड्यानी तो दूरदर्शनावर दाखविण्यात आला होता. मात्र या वार्तापटाला व्यावसायिक यश मिळाले नाही. पुढे तो तसाच अडगळीत पडला. ॲटनबरानी ह्या वार्तापटाची एक प्रतही स्वत:साठी विकत घेतली आहे.

१९६१–६२ साली मार्क रॉबिन्सन यानीही गांधीच्या जीवनावर आधारीत 'नाइन अवर्स टू रामा' हा चित्रपट काढला होता. डी. पी. कश्यप या भारतीयाने यात गांधीजीची भूमिका केली होती. हा चित्रपट पाहून 'ही लडखडती म्हातारी आकृती माझ्या प्रिय बापूची नाही' असे उद्गार पं. नेहरूंनी त्यावेळी काढले होते. ओघानेच या चित्रपटाचे प्रदर्शनही झाले नाही या पार्श्वभूमीवर ॲटनबरांचा 'गांधी' येतोय आणि म्हणूनच उत्सुकतेबरोबरच चिंताही आहे. *

# पुणे वार्ता

पृष्ठ १ वरून

येत नाही. मानवी ज्ञानाच्या क्षेत्रात आधुनिक युगात अत्यंत महत्त्वाची अशी वैशिष्टयपूर्ण विचारसरणी सांगणारे फार मोठमोठे बिचारवंत झाले आहेत; त्यांपैकी मी ज्याचे ज्यांचे चिंतनपूर्वक वाचन केले त्यांची त्यांची विचारसरणी मी आत्मसात करण्याचा प्रयत्न केला आहे; परंतु त्याच्यापैकी मला जास्त जवळचे कोणते व कोणते नाहीत, हे सांगणे अत्यंत कठीण आहे !'

आज एकीकडे शिक्षणाचा प्रसार वेगाने होत असतानाच दुसरीकडे निरनिराळ्या देवळामधील रांगाची लांबीही वाढतच चालली आहे, कर्मकांडात्मक ईश्वरभक्तीला आपण आळा घालू शकलेलो नाही, या श्री. नानासाहेब गोरे यांच्या व्यथेशी सहमत होताना तर्कतीर्थांनी दिलेलं उत्तरही परिस्थितीचं योग्य विश्लेषण करणारं होतं; पण त्या संदर्भात एवढंच एक मत नोंदवावंसं वाटतं की, विज्ञाननिष्ठ, चिकित्सक वृत्ती आपण जोपासत नाही हे जसं खरं आहे त्याचप्रमाणे वाढत्या भौतिक विकासाबरोबरच निर्माण होत असलेली असुरक्षिततेची, अनिश्चिततेची वाढती भावनाही देवळामधल्या या रांगा वाढवायला कारणीभूत आहे. पूर्वीच्या काळी पदवी प्राप्त करून घेणाऱ्या तरुणाला भवितव्याची फारशी चिंता नसे. 'आपण किमान उपाशी मरणार नाही, याची त्याला खात्री असे. आज परिस्थिती काय आहे ? त्याचबरोबर जीवनातलं हरवलेलं स्वास्थ्यही या प्रवृत्तीला खत-पाणी घालत आहे. अशा स्थितीत आजचा सामान्य तरुण Just can't afford to be a rationalist त्याला सतत कुठल्या ना कुठल्या तरी काडीचा आधार घ्यावासा वाटतो, किमान कुठे तरी अशी काडी अस्तित्वात आहे, अशी भावना त्याला जोपासावी लागते. अन्यथा घोर निराशावादानं तो पछाडला जातो.

१९ व्या शतकाच्या अखेरीस इंग्लंडमध्ये होऊन गेलेल्या मॅथ्यू अर्नोल्ड या कवीनं त्याच्या पिढीचं जे वर्णन केलं होतं तेच आजच्या भारतीय पिढीलाही लागू पडतं. अर्नोल्ड म्हणाला होता–

We are hangin between the two worlds,
One dead,
other powerless to born.

त्यामुळे हा सध्याच्या तरुण पिढीला मिळालेला शाप आहे, असं आपण समजून चाललं पाहिजे. अर्थात त्याबद्दल तरुण पिढीनं फार बाऊ करण्याचंही कारण नाही. कारण विश्वरहाटीनुसार हे अपरिहार्य आहे.

अर्थात हे सर्व जरी असलं तरी असं म्हटलंच पाहिजे की, आजची तरुण पिढी ज्या आयुष्याशी सामना करतेय ते लक्षात घेतलं तरी त्याचा हा दैववाद अक्षम्य आहे. दांभिक आत्मसमाधानापेक्षा संशयग्रस्ततेने पछाडले जाण्यात जास्त वेदना आहेत, जास्त आनंदही आहे. कारण A man dissatisfied is better than a pig satisfied.

तर्कतीर्थांची ही प्रकट मुलाखत ऐकत असताना आजच्या वैचारिक साहित्याविषयी तर्कतीर्थांची मत कोणी तरी विचारेल असं वाटत होतं. कारण मुलाखत घेणारे चौघेही-जण थोडे-फार साहित्यिक होते आणि स्वतः तर्कतीर्थांचा त्या क्षेत्रातील अधिकार वादातीत आहे, पण राजकीय-सामाजिक प्रश्नाच्या गदारोळात या विषयाकडे कोणाचंच फारसं लक्ष गेलं नाही. पण एका लेखी मुलाखतीत तर्कतीर्थांनी स्वतःच याबाबत विचार व्यक्त केले आहेत आणि ते मननीय आहेत.

आधुनिक मराठीतील वैचारिक साहित्याबद्दल आपणास काय वाटते ? वैचारिक निबंधाचा आजचा घाट कसा आहे, असावा, असे आपणास वाटते ? त्यात लालित्याला कितपत वाव आहे ? या प्रश्नमालिकेला उत्तर देताना तर्कतीर्थांनी म्हटले आहे–

'विद्यमान मराठी साहित्यामध्ये वैचारिक साहित्याला फारसे महत्त्वाचे स्थानच राहिलेले नाही. राजनीती, अर्थशास्त्र, सामाजिक संस्था, समाजरचना, धर्म, सामाजिक मानसशास्त्र इत्यादि विषयांच्यावर स्वतंत्र रीतीने सतत लेखन करण्याची प्रथाच मराठीमध्ये राहिलेली नाही. ललित साहित्य व ललित साहित्याची चर्चा यालाच सध्या प्राधान्य आहे. वैचारिक निबंध हा साहित्य-प्रकार मराठीमध्ये अपवादात्मकच दिसतो.

'वैचारिक निबंधात लालित्याला वाव आहेच; कारण विचारांचा आविष्कार करण्याची ललित शैली असू शकते. ललित शैली आणि तार्किक संगती ही एकरूपपणे राहू शकते.'

आजच्या सर्वच साहित्यिकांनी तर्कतीर्थांच्या या विचारांची दखल घेणं आवश्यक आहे.

टिळक स्मारक मंदिरात झालेली तर्कतीर्थांची ही प्रकट मुलाखत ऐकत असताना तर्कतीर्थांचे निवडक निबंध एकत्रित केलेलं 'विचारशिल्प' हे पुस्तक माझ्या डोळ्यांसमोर सारखं तरळत होतं. प्रसिद्ध विचारवंत रा. ग. जाधव यांनी या पुस्तकाचं संपादन केलं आहे. आपल्या संपादकीयामध्ये तर्कतीर्थांच्या आयुष्याच्या वाटचालीबद्दल श्री. जाधव लिहितात–

'शास्त्रीजी हे विसाव्या शतकाच्या प्रथमार्धाचे एक नमुनेदार ( टिपिकल ) भारतीय विचारवंत होत. हा भारतीय विचारवंत एका प्रचंड भोवऱ्यात गरगरत होता. शास्त्रीजीनी स्वतःबद्दल म्हटले आहे की, ' मी सतत वाहत आलो; पाय टेकायला कुठे जागाच सापडली नाही, ' हे खरे होते. या विचारवंतापुढे विचाराची नवी नवी क्षितिजे येत होती व त्याची सतत धावपळ चालू होती. एका डोंगराच्या शिखरावर चढून क्षितिज हाती लागेलसे वाटते न वाटते, तोच पुढचा डोंगर व त्याच्या माथ्यावरचे क्षितिज अवचित समोर अवतरत होते. कोणत्याही जागृत विचारवताला आत्मवंचना टाळायची असेल, तर या नव्या क्षितिजाची दखल घेणे भागच होते. कुठे थावावे याची कुणालाच खात्री वाटत नव्हती. मंझिले बदलत होती, मुक्काम बदलत होते. भारतीय प्रज्ञा जणू वातचक्रात सापडून भिरभिरत होती.'

श्री जाधवानी तर्कतीर्थांच्या वैचारिक प्रवासाचं केलेलं हे वर्णन आज वयाची ऐंशी वर्षं उलटून गेली तरी शास्त्रीबुवाच्या बाबतीत किती यथार्थ आहे ! अजूनही नव्या ज्ञानाची तीच आस, तीच उमेद, नवी शिखरं पादाक्रांत करण्याची तीच जिद्द, तीच ईर्षा, नव्या प्रकाशरेषाना सामोरी जाणारी तीच अहंकारविरहित लीनता !

विसाव्या शतकाच्या उगमापासून या शतकातील घटनाना साक्षी राहिलेला हा वैचारिक भ्रमंत्या आता कुठे तरी स्थिरावेल व एकविसाव्या शतकाच्या ललाटलेखाच्या काही पुसटशा तरी खुणा रेखाटून जाईल, अशी या ऐंशीव्या वाढदिवसानिमित्त अपेक्षा करावी काय ?

–प्रतिनिधी

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage–No. 11)


# माझ्या बाहुलीचं लग्न आहे बरं का!





बाहुलाबाहुलीच्या खेळात रमणारी तुमची चिटुकली
स्वत:च जेव्हा बोहल्यावर उभी राहील, त्या वेळी तिच्या बालपणीच्या
सर्व स्मृती तुमच्या अन्तःपटलावर उभ्या राहतील.
अर्थात दूरदर्शी मातापिता आपल्या मुलीच्या उच्च शिक्षणासाठी
तसेच लग्नासाठी योग्य ती आर्थिक तरतूद करतात.
महाबँकेची 'शुभमंगल' योजना अशीच दूरदर्शीपणाची द्योतक आहे
आजच आपल्या जवळच्या 'बँक ऑफ महाराष्ट्र' च्या शाखेत चौकशी करा.

**शिवाय बँकेचा रु. १००/- चा चेक भेटीदाखल मिळतो.**

बँकिंग सेवा व्यक्तिगत जिव्हाळा

**बँक ऑफ महाराष्ट्र**
(भारत सरकारचा उपक्रम)
मुख्य कचेरी: 'लोकमंगल', शिवाजीनगर पुणे ४११ ००५.

RAAS/BM/F04/80